दै. राज्य लोकतंत्र

प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा -संपादक

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२७५ | रविवार, दि.२६ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

D.S.Nagargoje 8908165555 9175606738 | A.S.Nagargoje 9284872700 8007003550

बालाजी बॅटरी हाऊस

सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस

आमच्याकडे सर्व प्रकारच्या बॅटरी योग्य दरात मिळतील.

पत्ता : काकु-नाना हॉस्पिटल समोर, जालना रोड, बीड.

# बाजारभाव अन हमीभावातील फरक थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करा

## कापड उद्योगाची सरकारकडे मागणी

**दिल्ली । वृतसंस्था**

**सीसीआय निम्म्याहून अधिक कापूस खरेदी करत असल्याने उद्योगांच्या अडचणी वाढल्या आहेत. त्यामुळे सरकारने हमीभावाने कापसाची खरेदी न करता बाजारभाव आणि हमीभावातील फरक थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावा. यामुळे शेतकऱ्यांनाही सीसीआयच्या खरेदीची वाट पाहावी लागणार नाही तसेच उद्योगांनाही वेळेत पुरेसा कापूस मिळेल. सरकारने कापसासाठी थेट लाभ हस्तांतरण योजना अर्थसंकल्पात जाहीर करावी, अशी मागणी द कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन टेक्टटाईल इंडस्ट्रीने केली आहे.**



द कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन टेक्टटाईल इंडस्ट्री अर्थात 'सीटी'ने अर्थमंत्री निर्मला सितारामण यांची भेट घेऊन ही मागणी केली. तसेच अर्थसंकल्पासून उद्योगाच्या असलेल्या अपेक्षा कळवल्या आहेत. कापूस खरेदीविषयी मागणी केली. 'सीटी'चे म्हणणे आहे आहे की, सरकारने सीसीआयच्या माध्यमातून कापसाची हमीभावाने खरेदी करण्यापेक्षा कापूस उत्पादकांना थेट हस्तांतरण योजना राबवावी. सरकारने अर्थसंकल्पात कापसासाठी थेट हस्तांतरण योजना जाहीर करावी. शेतकरी खुल्या बाजारात बाजारभावाने कापूस विकतील. जर शेतकऱ्याला मिळालेला भाव हमीभावापेक्षा कमी असेल तर सरकारने बाजारभाव आणि हमीभावातील फरकाची रक्कम थेट शेतकऱ्यांची खात्यात जमा करावी, अशी सूचना केली आहे. सध्या बाजारभाव कमी असल्याने शेतकरी सीसीआयला कापूस देत आहेत. सीसीआय सध्या निम्म्यापेक्षा जास्त कापूस खरेदी करत आहे. तर उद्योगांना कमी कापूस मिळत असल्याने अडचणी निर्माण होत आहेत. आता बाजारातील कापूस आवकही कमी होत जाईल. पान २ वर

> **“ सीसीआयकडून आतापर्यंत ७२ लाख गाठींची खरेदी**
>
> कापसाचे भाव हमीभावापेक्षा कमी असल्याने कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया अर्थात सीसीआयची खरेदी जोमात सुरु आहे. सीसीआयने आतापर्यंत जवळपास ७२ लाख गाठींची खरेदी केली आहे. तर यंदा सीसीआयची खरेदी १०० लाख गाठींच्या दरम्यान पोहचण्याचा अंदाज आहे. म्हणजेच देशातील एकूण उत्पादनापैकी सीसीआय तब्बल ३५ टक्क्यांच्या दरम्यान कापूस खरेदी करेल.

## शरद पवार यांची तब्येत बिघडली, ४ दिवसांचे सर्व कार्यक्रम रद्द

**पुणे । प्रतिनिधी**



ज्येष्ठ नेते शरद पवार यांची तब्येत बरी नसल्याने त्यांचे पुढील ४ दिवसांचे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. त्यांना खोकल्यामुळे कार्यक्रमात बोलताना त्रास होत आहे. यामुळे पुढील ४ दिवसांचे त्यांचे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून सांगण्यात आले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार गेली दोन दिवस कोल्हापूर, सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यादरम्यानच्या कार्यक्रमांत बोलताना पान २ वर



## मारुती चितमपल्ली यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर

नवी दिल्लीः प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्राने विविध क्षेत्रातील दिग्गजांना पद्म पुरस्काराने सन्मानित केले. महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिक आणि वन्यजीव अभ्यासक मारुती चितमपल्ली यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे.

डॉ. विलास डांगरे, चैत्राम पवार, मारुती चितमपल्ली यांना केंद्र सरकारने पद्मश्री पुरस्कार जाहीर केले आहेत. सरकारने साहित्य, कला, क्रीडा, आरोग्य यासह विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या दिग्गजांचा गौरव केला आहे.

# अवघ्या सहा महिन्यात ४८ लाख मतदार वाढल्याचे पुरावे द्या !

## मविआच्या १०० उमेदवारांची न्यायालयात याचिका, पृथ्वीराज चव्हाण यांची माहिती



> ***“ मतदार याद्यातील भरमसाठ वाढ अनाकलनीय व संशयास्पद***
>
> *लोकसभा निवडणुकीनंतर १३२ विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी २० ते २५ हजार नवीन मतदारांची नावे समाविष्ट करण्यात आली. लोकसभेला यातील ६२ विधानसभा मतदारसंघात महायुती आघाडीवर होती पण विधानसभेला याच १३२ मतदारसंघातून ११२ जागी महायुतीचा विजय झाला, हे महत्वाचे आहे. मतदार याद्यातील भरमसाठ वाढ अनाकलनीय व संशयास्पद आहे. यासंदर्भात निवडणूक आयोगाकडे माहिती मागितली असता त्यांनी अद्याप दिलेली नाही. निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या जनतेची फसवणूक केली आहे, असे काँग्रेसने म्हटले आहे.*

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकशाही व्यवस्थेत निष्पक्ष व पारदर्शक निवडणुका पार पाडण्याची जबाबदारी स्वायत्त संस्था असलेल्या निवडणूक आयोगाकडे आहे. परंतु आयोगाने महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत त्याला हरताळ फासला आहे. विधानसभेला मतदार याद्यांमध्ये मोठा घोटाळा केल्याने त्याचा फायदा भाजपा युतीला झाला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर सहा महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत ४८ लाख मतदार अधिक वाढले आहेत. विशेष म्हणजे २०१९ लोकसभा निवडणूक ते २०२४ ची लोकसभा निवडणूक या पाच वर्षात ३२ लाख मतदार वाढले तर मग अवघ्या सहा महिन्यात ४८ लाख मतदार कसे वाढले याचे उत्तर निवडणूक आयोगाने पुराव्यासह द्यावे, अशी मागणी प्रोफेशनल काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रविण चक्रवर्ती यांनी केली आहे.

राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून काँग्रेस पान २ वर

## भारतीय लोकशाही जगासाठी एक सर्वोत्तम उदाहरण – राष्ट्रपती मुर्मू

**नवी दिल्ली । वृतसंस्था**



**जगात भारताची लोकशाही ही केवळ सर्वात जुनी लोकशाही नाही तर ती जगातील सर्वात मोठी, वैविध्यपूर्ण, तरुण, सर्वसमावेशक आणि संवेदनशील लोकशाही आहे आणि ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले.**

राष्ट्रीय मतदार दिनानिमीत्त शनिवारी दि.२५ रोजी राजधानी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. यावेळी राष्ट्रपती बोलत होत्या. निवडणुका सुरळीत पार पाडण्यासाठी उत्कृष्ट कामगिरी केलेल्या राज्य आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी राष्ट्रपतींना इंडिया व्होट्स २०२४ : अ सागा ऑफ डेमोक्रसी या पुस्तकाची पहिली प्रतही भेट दिली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, नागरिकांनी सर्व प्रकारच्या प्रलोभनाच्या पलीकडे जात आपला मतदानाचा हक्क बजावण्याचा ठाम निर्धार करायला हवा. सुजान मतदारच आपल्या लोकशाहीला बळकटी देत असतात. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगाच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

## सुटीची सुचना

**आज दि. २६ जानेवारी २०२५ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त दै. राज्य लोकतंत्र कार्यालयास सुटी असल्यामुळे उद्या दि. २७ जानेवारी २०२४ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.**

**–व्यवस्थापक**

## शेतकरी कर्जमाफीला विरोध नाही–उपमुख्यमंत्री अजित पवार

**पुणे । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवारांनी शेतकरी कर्जमाफीवरून शनिवारी (दि.२५) स्पष्टीकरण दिले आहे. मी शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार नाही, असे कधी म्हणणार नाही, असे म्हणत अजित पवारांनी माध्यमांवर नाराजी व्यक्त केली. पुणे जिल्ह्यात दौंडच्या सभेत माझ्या भाषणात कर्जमाफीचा उल्लेख कधी ऐकला का, असा सवाल उपस्थित करत



कर्जमाफीला नकार असल्याचे अजित पवारांनी स्पष्ट संकेत दिले होते. त्यावरूनही राजकारण तापले होते. विरोधकांनी अजित पवारांवर टिका केली होती. त्यातच शेतकरी कर्जमाफीला अजित पवारांचा विरोध असल्याची बातमी माध्यमांमध्ये शुक्रवारी चर्चेचा विषय ठरली. त्यावरून अजित पवारांनी शनिवारी पुण्यात माध्यमांशी बोलताना स्पष्टीकरण दिले.

अजित पवार म्हणाले, मी शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार नाही, असे कधी म्हणणार नाही. आम्ही पान २ वर

## संतोष देशमुख हत्याप्रकरणी मुंबईत जनआक्रोश मोर्चा

**मुंबई । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणात शनिवारी दि.२५ जानेवारी मुंबईत जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. मुंबईतील मेट्रो सिनेमा ते आझाद मैदानापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चासाठी मुंबईच नाही तर राज्यातील विविध भागातून मोठ्या प्रमाणात लोक आले होते. यापुर्वी परभणी, बीड, धाराशिव, पैठण, छत्रपती संभाजीनगर, वाशिमनंतर मुंबईत मोर्चाचे आयोजन केले आहे.** पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ जानेवारी २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः १०.५० क्विंटल | २,५६१ | ३,५०२ | ३,०३६ |
| ज्वारी/हायब्रिड : २७.०० क्विंटल | २,००० | २,६०० | २,३८६ |
| मका/लोकलः ०.५० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १०१.५० क्विंटल | ६,६०० | ७,१९३ | ७,०१७ |
| उडीद : १.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| बाजरीः ४.५० क्विंटल | २,४०१ | २,७२० | २,६०३ |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,२५० | ७,२५० | ७,२५० |
| सोयाबीनः ९५.०० क्विंटल | ४,००० | ४,१०० | ४,०६६ |
| हरभराः १७९.५० क्विंटल | ३,९५० | ४,१०१ | ४,०६३ |

## वाल्मीक कराड ठणठणीत ; सगळे रिपोर्ट सार्वजनिक करा–अंजली दमानिया

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात खळबळ उडवणाऱ्या मस्साजोग संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडच्या प्रकृतीवर चर्चा रंगली आहे. कराडला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असतानाच, त्याचे वैद्यकीय रिपोर्ट सार्वजनिक करण्याची मागणी होत आहे.**

कराड ठणठणीत असताना आता त्याला दया कशासाठी?'' अशी विचारणा करत अंजली दमानिया यांनी कराडचे सर्व वैद्यकीय रिपोर्ट सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे. ब्लड टेस्ट, सीटी स्कॅन आणि सोनोग्राफी रिपोर्टसह सर्व माहिती प्रसिद्ध करावी, अशी मागणी त्यांनी केली. गुरुवारी वाल्मीक कराडने पोटदुखीची तक्रार केली होती, त्यामुळे त्याला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयातील परिसरात पान २ वर



## बलात्कार केलेल्यांना सोडवण्यासाठी अक्षय शिंदेची हत्या–जितेंद्र आव्हाड

**मुंबई । प्रतिनिधी**

बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणातील प्रमुख संशयित आरोपी अक्षय शिंदे याला खोट्या चकमकीत पोलिसांनी हत्या केली असल्याचा ठपका, दंडाधिकाऱ्यांच्या अहवालात ठेवण्यात आला आहे. तसेच हा अहवाल मुंबई उच्च न्यायालयानेही स्विकारला आहे.



या चकमकीत पाच पोलिसांवर गुन्हा दाखल करून कारवाई करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. त्यातच याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी बलात्कार केलेल्यांना सोडवण्यासाठी अक्षय शिंदे याची हत्या करण्यात आल्याचे वक्तव्य केले.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या आणि परभणीतील सोमनाथ पान २ वर

# फडणवीसांवर आम्हाला विश्वास; जरांगेंचा पुन्हा एल्गार!





**जालना । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आम्हाला विश्वास आहे. ते आमच्या मागण्या मान्य करतील. आता त्यांनी दाखवून द्यायचे आहे की त्यांच्या मनात मराठा समाजाविषयी प्रेम आहे की राग, असे वक्तव्य मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटी येथे केले आहे.**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी शनिवार दि.२५ जानेवारी पासून अंतरवाली सराटी येथे उपोषणाला सुरुवात केली आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र आणि सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी करण्यात यावी या जुन्याच मागण्यांसाठी त्यांनी उपोषणाला सुरुवात केली आहे. त्यासोबतच बीड येथील सरपंच दिवंगत संतोष देशमुख यांच्या हत्येतील आरोपींना फाशीची शिक्षा दिली पाहिजे या नवीन मागणीचाही त्यांच्या आंदोलनात समावेश करण्यात आला आहे. अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे यांच्यासोबत मराठा समाजानेही सामूहिक उपोषण सुरू केले आहे. तू पुन्हा आला की, मी पुन्हा बसणार, असा इशारा मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांना दिलेला होता. त्यांनी त्यांचे हे वाक्य आता प्रत्यक्षात आणले आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस हे सांगत होते की, आम्ही मराठा समाजाच्या मागण्यांच्या आड येत नाही. आमची कोणतीही आडकाठी नाही, असे सांगत मनोज जरांगे म्हणाले पान २ वर

## अग्रलेख

# फुटीचे ग्रहण अन् संशयाचे धुके

महाराष्ट्रातील जनतेने स्पष्ट बहुमताचे सरकार आणल्यानंतरही राज्यावरील फुटीचे ग्रहण काही सुटताना दिसत नाही. त्यामुळे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित दोन्ही शिवसेनेच्या मेळाव्यांवरही त्याचे सावट दिसून आले. हे बघता एकेकाळी महाराष्ट्राचा आवाज असलेल्या या संघटनेची पुन्हा शकले होणार काय, हा प्रश्न आता ठळक पुढे आला आहे. मागच्या अडीच ते तीन वर्षांपूर्वी सेनेत अभूतपूर्व फूट पाडून एकनाथ शिंदेंनी भाजपाच्या मदतीने राज्याचे मुख्यमंत्रिपद पटकावले. खरेतर अडीच वर्षे मुख्यमंत्रिपद भोगल्यानंतर पुन्हा मुख्यमंत्री होण्याची शिंदे यांची प्रबळ इच्छा होती. मात्र, भाजपाने बहुमताच्या जवळपास जात १३० जागा मिळवल्याने शिंदेंना माघार घ्यावी लागली. अखेर देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुख्यमंत्रिपद आले, तर शिंदे यांना नव्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्रिपदावर समाधान मानावे लागले. तेव्हापासून शिंदे अस्वस्थ दिसतात. थोडेसे कुठे खुट्ट झाले, की ते थेट दरेगाव गाठतात. पालकमंत्रिपदाच्या निवडीनंतर रूसलेल्या शिंदेंची काही पदांना स्थगिती देऊन समजूत काढण्यात आली खरी. मात्र त्यांच्या या सततच्या इमोशनल ब्लॅकमेलिंगला भाजपवाले वैतागलेले दिसतात.

तसे पाहिल्यास फडणवीस सरकार सत्तेवर आल्यापासून शिंदेंभोवतीचे वलय आत्ता पूर्वीसारखे राहिलेले नाही. त्यात त्यांची पक्षावरील पकडही काहीशी ढिली झाल्याचे बोलले जाते. आमदार तानाजी सावंत यांच्यासह सेनेचे काही आमदार नाराज असून, यातील काही आमदार हे शिंदे यांच्यापेक्षा उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अधिक जवळ गेल्याची वदंता आहे. मागच्या काही दिवसांत सामंत आणि फडणवीस यांच्यातही चांगले ट्युनिंग जमल्याचे दिसून येते. दावोसलाही ही जोडी एकत्र दिसल्याने त्यांच्यातील वाढती जवळिक चर्चेचा विषय बनला. सामंत यांच्यासोबत २० आमदार असून, शिंदेसेनेत लवकरच नव्या नेतृत्वाचा उदय होणार असल्याचा दावा विरोधी पक्षांकडून केला गेला. हा दावा सामंत यांनी फेटाळून लावला असला, तरी त्यातून संशयाचे वातावरण तयार झाले, हे नक्की. एकनाथ शिंदे यांनी शिवसेना फोडूनच मोठी राजकीय झेप घेतली. त्यांनी जे पेरले ते उगवणारच नाही, असे नव्हे. पण, त्याची आवश्यकता, टायमिंग या गोष्टीही तितक्याच महत्त्वाच्या असतील. उपयुक्तता मूल्य संपले, तर त्यांचा कार्यक्रम करायलाही भाजप मागे पुढे पाहणार नाही. दुसऱ्या बाजूला ठाकरेसेनाही फुटीच्या मार्गावर असल्याचा दावा केला जात आहे. तसे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला लोकसभेत बऱ्यापैकी यश मिळाले. त्यांचे ९ खासदार निवडून आले. मात्र, विधानसभेत त्यांचा आकडा २० पर्यंतच सीमित राहिला. किंबहुना, मुंबईतले त्यांचे वर्चस्व अजूनही कायम असल्याचे दिसते. त्यात मागच्या काही दिवसांपासून ठाकरे आणि फडणवीस यांच्यात सकारात्मक संवाद सुरू झाल्याचे सांगण्यात येते. सध्या केंद्र स्तरावर नितीशकुमार यांच्या संयुक्त जनता दलाने पुन्हा डोके वर काढले आहे. बेभरवशी नितीश कधीही केंद्रातल्या मोदी सरकारचा पाठिंबा काढू शकतात. अशा वेळी काठावर बहुमत असलेल्या सरकारसाठी उद्धव ठाकरे यांच्या ९ जागा आणि शरद पवारांच्या ८ जागा निर्णायक ठरू शकतात. मित्रपक्ष शिंदे यांच्याकडील ७ आणि अजितदादांकडील १ अशा ८ जागांपेक्षा ठाकरे व पवारांकडील १७ जागांचे गणितीय महत्त्व निश्चितपणे अधिक आहे. ठाकरेंची सेना आणि फडणवीसांच्या भाजपमधील कटुता कमी होण्यामागे ही पार्श्वभूमीही कारणीभूत असल्याचे दिसते. तथापि, अशा धक्कादायक बाबी घडल्या, तर शिंदेंचे वजन घटू शकते. हा धोका लक्षात घेऊनच शिंदे सेनेकडून ठाकरे सेनेच्या फुटीकरिता जोरदार प्रयत्न करण्यात येत असल्याच्या चर्चा आहेत. शांत डोक्याने राजकारण करण्यात एकनाथ शिंदे माहीर आहेत. सध्याच्या त्यांच्या हालचालीही बऱ्याच अर्थपूर्ण म्हणाव्या लागतील. अशामध्ये उदय सामंत यांचे नाव नवे नेतृत्व म्हणून पुढे येऊ लागल्याने दरेगावातल्या शेतीमध्ये रमणारा हा नेता पुन्हा ॲक्टिव्ह मोडमध्ये आला आहे. हे पाहता पुढच्या काही दिवसांत आपले महत्त्व दाखवून देण्याकरिता शिंदे नवा डाव टाकण्याची शक्यता नाकारता येणार नाही. ठाकरेसेनेचे ३ खासदार व अनेक माजी आमदार आमच्या संपर्कात असून, तांत्रिक कारणामुळे त्यांचा प्रवेश लांबल्याचा दावा सामंत यांच्यामार्फत केला जाणे, हेही बरेच बोलके म्हणता येईल. याशिवाय ऑपरेशन धनुष्यबाणसह ऑपरेशन टायगर राबवणार असल्याचा इशाराही ही मंडळी देताना दिसतात. असे असले, तरी याकरिता त्यांच्या पक्षाला किमान सहा खासदार तरी फोडावे लागतील, असे कायदेतज्ज्ञांचे म्हणणे आहे. सहा खासदार फुटले, तरी त्यांना आपला स्वतंत्र गट करावा लागेल आणि संबंधितांच्या पक्षात विलीन व्हावे लागेल. पण, आजतरी शिंदे गटाच्या बाजूने इतके खासदार झुकलेले दिसत नाहीत. मात्र, त्यांचे फोडाफोडीसाठीचे प्रयत्न कायम राहू शकतात. सेनेच्या पहिल्या फुटीत शिवसेना आमचीच असा दावा एकनाथ शिंदे आणि कंपनीकडून केला गेला. निवडणूक आयोगानेही त्याला हिरवा कंदील दिला. तर न्याय यंत्रणेच्या विलंबानेही या साऱ्याला अप्रत्यक्ष बळ मिळाले. या साऱ्यातून पक्षांतर बंदी कायद्याची कशी पायमल्ली झाली, हे आपण पाहिलेच आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेता एखाद्या पक्षात फूट पाडणे तसे सहजशक्यच म्हणता येईल. इतकेच काय अमुक एक पक्ष माझा आहे, असा यशस्वी दावा करून संबंधित पक्षाच्या संस्थापकाला बेदखल करणेही अवघड म्हणता येणार नाही. महाशक्तीने मनावर घेतले, तर कुणाचीही शकले होऊ शकतील, असेच सध्याचे वातावरण आहे.

# लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा हक्क बजावावा-तहसीलदार वैशाली पाटील



**आष्टी । प्रतिनिधी**

**लोकशाहीमध्ये प्रत्येक मतदाराला मतदानाची किंमत महत्वाची असून,आपला हक्क मतदान बजावून लोकशाही बळकट करण्याचे अहवान आष्टीच्या तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले.**

आष्टी तालुक्यातील कडा ग्रामपंचायत कार्यालयासमोर आयोजित राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रमात तहसिलदार पाटील बोलत होत्या.राष्ट्रीय मतदार दिन कार्यरक्रमांतर्गत कडा ग्रामपंचायत आणि कडा गावातील विविध माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयांनी एकत्र येऊन ग्रामपंचायत येथे राष्ट्रीय मतदार दिन साजरा केला.पुढे बोलताना पाटील म्हणाल्या की,मतदान हे सर्वांनी राष्ट्रीय कर्तव्य समजून लोकशाही बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.देशाचा सुजाण नागरिक म्हणून मतदान करावे.तसेच मुलांनी मोबाईल चा वापर कमी करून आपले ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न करावेत.आज बहुसंख्य विद्यार्थ्यांचा मोबाईल मुळे वेळ वाया जात आहे.यापुढील काळात मोबाईल विरहित विद्यार्थीच जीवनात यशस्वी होतील.पालकांनी आपल्या मुलांना मोबाईल पासून दूर ठेवण्याचे आवाहन तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले.दरम्यान प्रारंभी गावातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून सर्व शाळांच्या विद्यार्थ्यांनी अभिवादन करून रॅलीस प्रारंभ केला. त्यानंतर ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौकातून ग्रामपंचायत येथे आली.ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृतीची शपथ घेतली तसेच संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी हातामध्ये मतदार जनजागृती चे फलक झळकावले.या राष्ट्रीय मतदार दिनाच्या कार्यक्रमात मोतीलाल कोठारी विद्यालय, श्रीराम विद्यालय, भगिनी निवेदिता विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.यावेळी सरपंच लताबाई भिमराव पाटील, उपसरपंच दीपक कर्डिले, सामाजिक कार्यकर्ते युवराज पाटील, माजी उपसरपंच बाळासाहेब कर्डीले,ग्रामविकास अधिकारी आबासाहेब खिलारे, मंडळ अधिकारी नवनाथ औंधकर, तलाठी जगदीश राऊत,मोहन पाचंगे,दत्ता होळकर,मोहमद सय्यद,विष्णू कुसळकर,बाळासाहेब देशमुख,शेख शाकीर, मुख्याध्यापक अर्जुन पाचरणे,मथाजी शिकारे,यांच्यासह शिक्षक ,विद्यार्थी,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रस्तावीक प्रशांत दगडे यांनी तर आभार ग्रामविकास अधिकारी आबासाहेब खिलारे यांनी व्यक्त केले.

## प्रजासत्ताक दिन विशेष

# सारे जहाँ से अच्छा..प्रजासत्ताक..!

**स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जगातील कोणतीही आर्थिक ओळख नाही अशा स्थितीत असणारा आपला देश आता जगातली पाचवी अर्थसत्ता बनला आहे आणि याच पार्श्वभूमीवर आपण २६ जानेवारीला ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करणार आहोत या निमित्ताने देशाच्या विकासाची वाटचाल आणि त्याला असलेले संविधानाचे अधिष्ठान अधिक प्रभावीपणे कार्यरत असल्याचे जाणवते.**



आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले त्यानंतर राज्यघटना अर्थात संविधान लिहिण्याचे काम सुरू झाले. या संविधानास स्वीकार करून आपण संघराज्य हे देखील सार्वभौम प्रजासत्ताक म्हणून घोषित केले तो दिवस अर्थात २६ जानेवारी १९५० होय. प्रजासत्ताक दिन साजरा करण्याचे नेमके प्रयोजन देखील हेच आहे. आपण स्वीकार केलेल्या संविधानाच्या स्मरणाचा हा दिवस. संविधान हा प्रत्येक भारतीय व्यक्तीचे हक्क, कर्तव्य यांचा अमूल्य असा दस्तऐवज आहे आणि याद्वारेच लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांची प्रतिष्ठापना झालेली आहे. आपले संविधान डोळ्यासमोर येते ते भारतीय लोकांच्या आकांक्षा आणि स्वप्ने यांना आधार देणारे अधिष्ठान म्हणून याचे असलेले महत्त्व अधोरेखित होते. आपल्या स्वातंत्र्यासाठी मोठा लढा उभारण्यात आला होता आणि यात अनेकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिलेले आहे. या सर्व स्वातंत्र्यसैनिक हुतात्म्यांसह या स्वातंत्र्यलढ्यातील प्रत्येक स्वातंत्र्यसैनिकाचे स्मरण करण्याचा हा दिवस त्यानंतर आधुनिक भारताच्या उभारणीत सीमेवर युद्ध लढून देशाच्या संरक्षणासाठी शहीद झालेला जवानांचेही स्मरण करण्याचा हा दिवस आहे. संविधानात प्रतिष्ठापित मूल्ये आणि तत्वे यांचे पालन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. ती मान्य करून प्रगत आणि समृद्ध भारताची उभारणी करण्यासाठी वचनबद्ध होण्याचा हा दिवस म्हणजे प्रजासत्ताक दिन आहे. गेल्या ७६ वर्षात सर्व क्षेत्रात आपला देश अग्रेसर राहिलेला आहे. मंगळ आणि चंद्रावरच्या मोहिमेत यश मिळवताना दुसरीकडे अन्न धान्य उत्पादनात आलेली आत्मनिर्भरता औद्योगिक क्रांतीतून साधलेली प्रगती हे सारं आपण या दिवशी आठवलं पाहिजे. जागतिक क्षेत्रात गुंतवणूकदार उत्तम संधीचा देश म्हणून आपल्याकडे बघतात त्यामुळे आपल्या देशावर १५० वर्षे राज्य करणाऱ्या ब्रिटनला मागे टाकून पहिल्या पाच आर्थिक सत्तांमध्ये आपण प्रवेश केला आहे. दळणवळण क्रांतीत आपण ५ चा टप्पा ओलांडून ६ तंत्राच्या उंबरठ्यावर आहोत आणि सोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात मध्येही आपण वाटचाल सुरू केली आहे. आगामी काळ हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा काळ आहे याच जाणिवेतून आपण पावलं उचलायला हवी. चांद्रयान प्रक्षेपण बघण्यासाठी बैलगाडीतून जाणारा हा आपला भारत देश आजही जमिनीवर आहे आणि अवकाशालाही गवसणी घालतोय म्हणून आपला हा देश खऱ्या अर्थाने सारे जहाँ से अच्छा ठरतो.

**जयहिंद....!**



**प्रशांत विजया अनंत दैठणकर**
**जिल्हा माहिती अधिकारी, बीड**
**मो. ९८२३१९९४६६**

# उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत जालन्यात उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख बोराडे यांचा प्रवेश

**मंठा । प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे गटाचे परतुर विधानसभेचे उमेदवार आसाराम बोराडे यांचा आज शिवसेना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटामध्ये प्रवेश झाला यामुळे उबाठा गटाला मोठा धक्का बसला.परतूर विधानसभा मतदारसंघातील हजारो कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश झाला ए जे बोराडे ज्या पक्षात होते तो पक्ष हुकूमशाहीचा होता, आपला पक्ष हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा, सहकार्यांचा पक्ष आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचे ते सैनिक आहेत. हजारो कार्यकर्त्यांसह त्यांचे पक्षात स्वागत करतो. जिल्ह्यात पक्षाचे कार्य ते जोमाने वाढवतील असा विश्वास शिवसेना पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जालन्यात सभेमध्ये बोलताना व्यक्त केला . पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख तथा मंठा बाजार समितीचे सभापती ए जे बोराडे यांनी आपल्या हजारो समर्थक कार्यकर्त्यांसह जाहीर प्रवेश केला. श्री बोराडे यांच्या पक्षप्रवेशाने जालना जिल्ह्यात पक्ष बळकट होईल असा विश्वास ना. शिंदे यांनी व्यक्त केला. जालना येथील आझाद मैदानावर शनिवार ता. २५ रोजी आयोजित आभार मेळाव्यात जिल्हाप्रमुख ए जे बोराडे आणि पदाधिकाऱ्यांचा प्रवेश सोहळा संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, मंत्री संजय शिरसाठ, मंत्री संजय राठोड, मंत्री उदय सामंत, खासदार संदिपान भुमरे,मेळाव्याचे संयोजक माजी मंत्री आमदार अर्जुनराव खोतकर, आमदार हिकमत दादा उढाण यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे यांच्या पक्षप्रवेशाने जिल्ह्यात उबाठा गटाला मोठा धक्का बसला आहे. जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांच्या नेतृत्वाखाली मंठा पंचायत समितीचे माजी उपसभापती किसनराव मोरे, उबाठा गटाचे उपजिल्हाप्रमुख बाबा तेलगड, परतुर तालुका प्रमुख सुदर्शन सोळंके, माजी सभापती संतोष वरकड, बाजार समितीचे संचालक केशवराव सरकटे, माजी नगराध्यक्षा सौ मीराताई बाळासाहेब बोराडे, तालुका संघटक तुळशीराम कोहीरे, माजी सभापती माधवराव टकले, भटक्या विमुक्त जाती जिल्हाध्यक्ष हरिभाऊ चव्हाण, जि प सदस्य संजय राठोड, संचालक बाबाराव राठोड, डॉ. दत्तात्रय काकडे, मधुकर काकडे, तालुका समन्वयक अशोक आघाव, अरुण उफाड, अशोक भागडे, रामजी खवल, दिगंबर बोराडे, प्रल्हादराव खेडेकर, गया ताई पवार, बेबीताई पावसे यांच्यासह पदाधिकारी, तालुकाप्रमुख, उपतालुकाप्रमुख, विभागप्रमुख, उपविभागप्रमुख, महिला आघाडी, युवा सेना व परतुर विधानसभा मतदारसंघातील हजारो कार्यकर्त्यांनी ना. एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला.



# पान १ वरून...

### बाजारभाव अन हमीभावातील

तेव्हा उद्योगांपुढील समस्या आणखी वाढणार आहे. त्यावेळी सीसीआयकडेच कापसाचा सर्वाधिक स्टॉक असेल. भावातील फरक थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केल्यास शेतकरी वेळेवर कापूस विकू शकतील. सीसीआयला कापूस देण्यासाठी शेतकऱ्यांना वाट पाहावी लागणार नाही. तसेच सीसीआयला कापूस खरेदी करून, तो साठवून आणि नंतर विक्री करण्यासाठी लागणारा खर्चही वाचेल. यामुळे शेतकरी, जिनिंग, सुतगिरण्या आणि कापड उद्योगालाही अडचणींचा सामना करावा लागणार नाही. उद्योगांना वेळेत पुरेसा कापूस मिळेल. सरकार दरवर्षी कापसासाठी हमीभाव जाहीर करते. तसेच बाजारभाव हमीभावापेक्षा कमी झाल्यानंतर सीसीआय थेट शेतकऱ्यांकडून कापसाची हमीभावाने खरेदी करते. खरेदी केल्यानंतर कापूस गोदामांमध्ये साठवला जातो आणि नंतर त्यांची विक्री लिलावाद्वारे खुल्या बाजारात केली जाते.

---------------

### अवघ्या सहा महिन्यात ४८ लाख मतदार

पक्षाने राज्यभर लोकशाहीच्या रक्षणासाठी आंदोलन केले व पत्रकार परिषदा घेतल्या. मुंबईत गांधी भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेला प्रोफेशनल काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रविण चक्रवर्ती, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व माजी खासदार कुमार केतकर उपस्थित होते. यावेळी पत्रकारांना संबोधित करताना प्रविण चक्रवर्ती पुढे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रात एकूण मतदारांची संख्या ९.७ कोटी असल्याचा दावा निवडणूक आयोगाने केला आहे पण मोदी सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने जाहीर केलेल्या महाराष्ट्रातील १८ वर्षांवरील प्रौढ लोकसंख्या तर ९.५४ कोटी आहे. या आकडेवारीनुसार १६ लाख मतदारसंख्या वाढली कशी? मतदारयाद्या नोंदणीमध्ये अनेक घोळ करण्यात आले आहेत. शिर्डी मतदारसंघातील लोणी गावात एकाच पत्त्यावर ५ हजार मतदारांची नोंदणी करण्यात आली, या मतदारांकडे काँग्रेस उमेदवार प्रतिभा घोगरे यांनी ओळखपत्र, रहिवाशी दाखल्याची विचारणा केली असता ते स्थानिक रहिवाशी नसल्याचे उघड झाले. निवडणूक आयोगाकडे याची तक्रार केली असता त्यावर उत्तर मिळाले नाही. यावेळी बोलताना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, राष्ट्रीय मतदार दिनी निवडणूक आयोगाला शुभेच्छा दिल्या पाहिजेत पण महाराष्ट्रातील जनता त्यांना शुभेच्छा देऊ इच्छित नाही. निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या जनतेची फसवणूक केली आहे. विधानसभा निवडणुकी संदर्भात मतदार याद्यांमधील घोळ हा एक महत्वाचा मुद्दा आहे. यासंदर्भात काँग्रेस पक्ष निवडणूक आयोगाच्या भूमिकेविरोधात लढत आहे. विधानसभेतील मविआच्या १०० पराभूत उमेदवारांनी राज्यातील विविध न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. भारतातील लोकशाही प्रगल्भ असून जगाचे आपल्या लोकशाही व्यवस्थेकडे लक्ष असते. निवडणूक आयोग जर निवडणुकीत पक्षपात करत असेल तर तो आपल्या लोकशाहीसाठी चिंताजनक असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

---------------

### शरद पवार यांची तब्येत बिघडली,

त्यांना खोकल्यामुळे त्रास जाणवत होता. आताही त्यांची तब्येत ठीक नसल्याने त्यांचे पुढील ४ दिवसांचे कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. शरद पवार यांनी नुकतेच सांगली दौऱ्यादरम्यान जत तालुक्यातील संख या गावात स्व. बसवराज सिद्धगोंडा पाटील यांच्या पुतळ्याचे अनावरण केले. तर कोल्हापूरमध्ये व्हाईट आर्मी संस्थेच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात ते उपस्थित राहिले होते. दरम्यान, प्रजासत्ताक दिनानिमित्त रविवारी (दि. २६ जानेवारी २०२५) रोजी पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष, खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते सकाळी ९ वाजून ३० मिनिटांनी मुंबई विभागीय कार्यालय तसेच सकाळी १० वाजून १० मिनिटांनी मुंबईतील राष्ट्रवादी भवन येथे ध्वजारोहण करण्यात येणार आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून सांगण्यात आले आहे.

----------

### संतोष देशमुख हत्याप्रकरणी

संतोष देशमुख यांची क्रूर हत्या करण्यात आली. त्यानंतर राज्यभर संतापाची लाट उसळली. राज्यात संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय द्या, आरोपींना फाशी द्या अशी विनंती करण्यात आली आहे. दादागिरी चालणार नाही, न्याय मिळाला पाहिजे अशा घोषणा या मोर्चा दरम्यान करण्यात आल्या. अभिनेता सैफ अली खानवरील हल्ला करणारा आरोपी लागलीच पकडण्यात येतो. पण संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे हा फरार आहे. त्याला राजाश्रय मिळत असल्याचा आरोप मोर्चेकऱ्यांनी केला. भावाचा खून होऊन दोन महिने झाले तरी आरोपींना का अटक होत नाही, असा सवाल संतोष देशमुख यांच्या बहिणीने विचारला आहे. या बहिणीचा आक्रोश सरकारला दिसत नाही का, असे त्या म्हणाल्या. वैभवी देशमुख ही इयत्ता बारावीमध्ये आहे, लहान मुलगा आहे. लहान भाऊ सलाईन लावल्यानंतर मोर्चात आला आहे. आपली तब्येत ठीक नसते, तरीही सरकार न्याय देण्यासाठी उशीर लावत असल्याच्या भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या. शासनाला आम्ही वारंवार मागणी केली आहे की, जो फरार आरोपी आहे त्याचा तात्काळ शोध घेऊन त्याला अटक केली जावी. तसेच जे आरोपी पकडले आहेत त्यांना फाशीची शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी आम्ही शासनाकडे केली आहे. बीड मधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याचे प्रकरण असेल किंवा परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येचे प्रकरण असेल, यात क्रूरपणे हत्या करण्यात आली आहे. समाजात या घटनांबद्दल आक्रोश निर्माण झाला आहे. त्यामुळे सरकारने या लोकभावनेची दखल घेऊन सक्त कारवाई करावी, अशी मागणी या मोर्चातील आंदोलकांनी व्यक्त केली.

-------------

### शेतकरी कर्जमाफीला विरोध

देखील शेतकरी आहोत. जिथे शेतकऱ्याला मदत होईल, अशा गोष्टी करण्याचा प्रयत्न आम्ही करतो. मात्र धादांत खोट्या बातम्या देऊन माझी बदनामी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. असेही पवार म्हणाले. भाजपने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करू अशी ग्वाही दिली आहे. परंतु लाडकी बहिण योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर भार पडल्याने शेतकरी कर्जमाफीला अजित पवारांचा विरोध असल्याच्या बातम्या माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाल्या. त्यावरून विरोधकांनी टिका केली. परंतु शनिवारी मात्र अजित पवारांनी यावर स्पष्टीकरण देत शेतकरी कर्जमाफीला विरोध नसल्याचे सांगितले. यावेळी पवारांनी सुत्रांच्या मुद्द्यावरून माध्यमांना टोलाही लगावला. पवार म्हणाले, सुत्रांच्या हवाल्याने कर्जमाफीची बातमी देण्यात आली. पण मला बोलायचे असेल तर मी स्वत: बोलेन. तरीही प्रसारमाध्यमांकडून सुत्रांच्या हवाल्याने का बातम्या दिल्या जातात. या सूत्राला जीवनगौरव पुरस्कार दिला पाहिजे, असा टोलाही पवारांनी लगावला. तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठात ६० कोटींच्या आराखड्याला मान्यता दिल्याचेही पवारांनी सांगितले. दरम्यान, राज्यातील महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलेला शब्द पूर्ण करावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

--------------

### बलात्कार केलेल्यांना सोडवण्यासाठी

सुर्यवंशी मृत्यू प्रकरणी शनिवारी काढलेल्या मोर्चात जितेंद्र आव्हाड बोलत होते. यावेळी जितेंद्र आव्हाड म्हणाले की, अक्षय शिंदेला ज्या अंतरावरून गोळी झाडली. ते अंतर हस्यास्पद आहे. त्याच्या हाताला बेड्या होत्या. मग तो कोणत्या हाताने रिव्हॉलवर काढणार होता असा सवाल करत आता तर हे ही स्पष्ट झाले की, त्या रिव्हॉलवरवर अक्षय शिंदे यांच्या हाताचे ठसेच नाहीत. हे प्रकरण बलात्काराचे असल्याने लोक बोलायला घाबरतात. पण अक्षय शिंदेने बलात्कार केलाच नाही असेही यावेळी सांगितले. जितेंद्र आव्हाड पुढे बोलताना म्हणाले की, बलात्कार केलेल्यांना सोडण्याकरता अक्षय शिंदे याची हत्या करण्यात आली. मग बलात्कार केलेले कोण होते असा सवाल करत अक्षय शिंदेची हत्या झाल्यानंतर ते लगेच हजर झाले. यातील सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे लोकांची मेमरी शॉर्ट असते या एकाच गेमवर सरकार खेळत असते अशी टीकाही यावेळी त्यांनी केली. पुढे बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले की, अक्षय शिंदे याला जिथे मारलं तो मतदारसंघ माझा आहे. त्याला जिथे मारले तिथे बाजूलाच एक चायवाला होता. त्याने मला फोन करून सगळे सविस्तर सांगितले दुपार पर्यंत अक्षय शिंदे याचे प्रकरण बाहेर आले. आता प्रश्न आहे की, अक्षय शिंदे याच्यावर ज्या पोलिसांनी गोळ्या झाडल्या त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आणि चौकशी करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. न्यायालयाने पहिल्याच दिवशी विचारले होते की, हे असे कसे होऊ शकते. याप्रकरणात अद्याप गुन्हा दाखल झालेला नसल्याचेही ते म्हणाले.

------------

### वाल्मीक कराड ठणठणीत ; सगळे रिपोर्ट

सीसीटीव्ही लावून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. त्याआधी कराडला विशेष मकोका न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली होती. जिल्हा कारागृहात असताना कराडने पोटदुखीची तक्रार केल्यानंतर डॉक्टरांनी त्याची तपासणी केली. रुग्णालयात आणल्यानंतर ब्लड टेस्ट, सीटी स्कॅन, सोनोग्राफीसह विविध तपासण्या करण्यात आल्या. बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी यासंदर्भात माहिती दिली.

-------------

### फडणवीसांवर आम्हाला

की, विधानसभेत मराठा बांधवांनी यांना मतदान केले आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यावर आम्ही विश्वास दाखवला आहे. आता त्यांची जबाबदारी आहे की, त्यांच्या मनात मराठा समाजाविषयी प्रेम आहे की राग हे आता दिसून येईल. आताच मी काही बोलणार नाही, मात्र फडणवीस आता मुख्यमंत्री आहेत. त्यांनी मराठा समाजाच्या मागण्या मान्य कराव्या, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे.

-----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार, दि. २६ जानेवारी २०२५



## भरधाव कार नदीपात्रात कोसळली; पुण्याचे पाच जखमी

म्हसोबावाडी : पुण्यावरून बीड कडे जात असलेली चार चाकी कार भरधाव वेगात असल्याने व रस्त्याचा अंदाज न आल्याने पुलावरून नदीपात्रात पडल्याची घटना शुक्रवारी रात्री आठच्या दरम्यान बीड नगर राष्ट्रीय महामार्गावर कडा येथे घडली हे अपघातात पाच जण जखमी झाले असून जखमेवर कडा येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत पुणे इथून बीडला जात असलेली कार( एम एच १४ एल ए ५३ ४१) ही कार भरगाव वेगात असल्याने कार थेट पुलावरून नदीपात्रात पडली या अपघातात कारमधील शुभम गाडे, महावीर घोडके, चैतन्य धायबर ,अजय चोरमारे ,सर्व राहणार पुणे हे पाच जण गंभीर जखमी झाले आहेत जखमेवर काडा येथील रुग्णालयात प्राथमिक उपचार सुरू आहेत घटनास्थळी कडा चौकीच्या पोलिसांनी धाव घेत जखमींना खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे.

# महाराष्ट्र कारागृह विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना राष्ट्रपती पदक जाहिर



**पुणे । प्रतिनिधी**

दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजीच्या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या औचित्यावर महाराष्ट्र कारागृह व सुधार सेवा विभागातील खालील अधिकारी व कर्मचारी यांना गुणवत्तापुर्ण सेवेकरीता केंद्रीय गृह विभागाकडून मा.राष्ट्रपतींचे सेवापदक जाहिर करण्यात आले आहे.

विवेक वसंत झेंडे, अतिरिक्त अधीक्षक, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, सुनील तांबे, पोलीस उपअधीक्षक, कारागृह मुख्यालय, पुणे, अहमद शमसुद्दीन मनेर, हवालदार, सांगली जिल्हा कारागृह, गणेश महादेव गायकवाड, हवालदार, येरवडा मध्यवर्ती कारागृह

प्रल्हाद दत्तात्रय कुदळे, हवालदार, दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे तुळशीराम काशीराम गोरवे, हवालदार, सांगली जिल्हा कारागृह उक्त नमुद कारागृह अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्या सेवा कालावधीत शासकीय कर्तव्याप्रती दाखविलेली सचोटी व निष्ठा याबद्दल गुणवत्तापुर्ण सेवेकरीता सदर सेवापदक जाहिर करण्यात आले आहे. सदरील सेवापदक हे नमुद अधिकारी व कर्मचारी यांच्या शासन सेवेतील निष्ठेचा सन्मान आहे.

कारागृह विभागाचे प्रमुख मा.श्री.प्रशांत बुरडे, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा.श्री.डॉ.जालिंदर सुपेकर, विशेष पोलीस महानिरीक्षक (मु), कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणेयांनी मा.राष्ट्रपतींचे सेवापदक प्राप्त नमुद अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

## मराठी पत्रकार परीषदेच्या पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित रहा

### बीड जिल्हा पदाधिकाऱ्यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषद मुंबई, व परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघ व सेलू तालुका मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आदर्श जिल्हा व तालुका पुरस्कार वितरण तसेच पत्रकार मेळावा दि. १ फेब्रुवारी रोजी परभणी जिल्हयातील सेलू येथे आयोजित केला आहे. या मेळाव्यास बीड जिल्हयातील तालुका पदाधिकाऱ्यांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

साई नाट्यगृह सेलु येथे दि.१ फेब्रुवारी २०२५ रोजी सदरील कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख हे राहणार असून या कार्यकमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून परभणी जिल्हयाच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर व सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर,कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, उपाध्यक्ष गोपी लांडगे, गणेश मोकाशे,हेमंत वनजू, अविनाश भांडेकर,चंद्रकांत बरदे, विभागीय सचिव दिपक कैतके, पी.पी.कुलकर्णी, रवी उबाळे, प्रदिप घुमटवार,शिखरचंद बागरेचा, मनोज खांबे, सचिन शिवशेट्टे, अमोल खरे, चंद्रकांत क्षीरसागर, राज्य प्रसिध्दी प्रमुख संदीप कुलकर्णी, सहायक राज्य प्रसिध्दी प्रमुख भरत निगडे, राज्य महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डीजीटल मिडिया परिषदेचे राज्यप्रमुख अनिल वाघमारे, , डीजीटल मिडिया परिषद कार्याध्यक्ष सनी शिंदे, डीजीटल मिडिया प्रमुख परिषद उपाध्यक्ष अनिल उंबरकर आदींची प्रमूख उपस्थिती राहणार आहे.

या मेळाव्यास बीड जिल्हयातील पत्रकार बांधवांनी सेलू येथे सकाळी ९.३० वाजता उपस्थित राहून परिषदेने आयोजित केलेल्या एकता रॅलीस सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगर विभागीय समन्वयक सुभाष चौरे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके ,कार्याध्यक्ष सतिष बियानी,सरचिटणीस प्रा.राजेंद्र बरकसे, कोषाध्यक्ष छगन मुळे,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हांगे,उपाध्यक्ष अविनाश कदम ,चंद्रकांत राजहंस, जुनेद बागवान, दिलीप झगडे,संजय रानभरे, गौतम बचुटे,सय्यद शाकेर,हल्ला विरोधी कृती समिती निमंत्रक दत्ता आंबेकर,समन्वयक अभिमान्यु घरत,आदींनी केले आहे.

**रॅलीचे जोरदार स्वागत करा**

सेलू येथील कार्यक्रमाच्या निमित्ताने पुणे येथून सर्व पदाधिकाऱ्यांची रॅली निघणार आहे .ही रॅली दिनांक ३१ जानेवारी रोजी पुण्यातून निघणार असून बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा, बीड, वडवणी, माजलगाव या ठिकाणी येणार आहे. या रॅलीचे सर्व तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी जोरदार स्वागत करावे तसेच या रॅलीत सहभागी होऊन सेलूकडे रवाना व्हावे असे आवाहन बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके यांनी केले आहे.

## आष्टीच्या गंगाई-बाबाजी महोत्सवातील आदर्श पुरस्कार वितरण अभिनेत्री कल्याणी चौधरी यांच्या हस्ते होणार

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.भीमराव धोंडे यांचे माता-पिता स्मृतिप्रीत्यर्थ आष्टी येथील भगवान महाविद्यालय मैदानावर गंगाई -बाबाजी महोत्सव २०२५ भगवान कालेजच्या आवारात दि.३० जानेवारी ते १ फेब्रुवारी या तीन दिवशीय होणार आहे.या महोत्सवाचे उद्घाटन दि.३० जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वा.माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांच्या हस्ते होणार आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष माजी आ.भीमराव धोंडे हे भुषविणार आहेत.या महोत्सवातील सर्व स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ आष्टीकरांनी घ्यावा असे आवाहन प्राचार्य डा.दत्तात्रय वाघ यांनी केले आहे.**



उद्घाटन सोहळ्यानंतर दुपारी १२ वा.वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.या महोत्सवात शेतकऱ्यांच्या मुलांचे लांबलेले विवाह एक सामाजिक समस्या, नितीमुल्यांचा वाढता -हास आणि सामाजिक जीवन हे तीन विषय स्पर्धेसाठी आहेत.महाविद्यालयीन स्नेहसंमेलन आणि वार्षिक स्नेहसंमेलन होणार आहे.दि.३० जानेवारी २०२५ रोजी काव्यवाचन स्पर्धा,वक्तृव स्पर्धा,दि.३१ जानेवारी रोजी संस्थेतील शाळा, महाविद्यालयाचे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

दि.१ फेब्रुवारी रोजी सकाळचे सत्रात मान्यवरांच्या हस्ते " गंगाई - बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार वितरण " दुपारचे सत्रात सायंकाळी ४ खुल्या लावणी स्पर्धा होणार आहेत.दि.१ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी बक्षीस वितरण " गंगाई-बाबाजी " राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.या सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती ना.प्रा.राम शिंदे आणि अभिनेत्री कल्याणी चौधरी यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी आ.भीमराव धोंडे राहणार असुन प्रमुख उपस्थिती युवानेते डा. अजयदादा धोंडे यांची लाभणार आहे.प्रत्येक स्पर्धेचे बक्षीस वितरण स्पर्धा संपताच केले जाईल. महोत्सव यशस्वी होण्यासाठी भगवान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय वाघ,उपप्राचार्य डा. ज्ञानदेव वैद्य,उपप्राचार्य डा. अाप्पासाहेब टाळके,उपप्राचार्य सुनिल भवर,प्रा.डॉ.बाळासाहेब गावडे,प्रा.डॉ.आबासाहेब पोकळे, प्रा.डा.वंदना घोडके यांच्यासह सर्व प्राध्यापक आणि संयोजक समिती परिश्रम घेत आहेत.

## न.प.मधील भ्रष्टाचार सबंधी चार मागण्या मान्य झाल्यामुळे उपोषण तुर्तास मागे -पठाण

बीड । प्रतिनिधी

नगर परिषद बीड मधील भ्रष्टाचार संबंधी चार मागण्या मान्य झाले कारणाने दि.२५ जानेवारी २०२५ रोजीचे जिल्हाधिकारी कार्यालया बीड समोरील अमरण उपोषण तुर्त मागे घेण्यात आल्याचे समाजसेवक मुकरमजान पठाण यांनी आपल्या पत्राकात म्हणटले आहे.



या बाबत अधिक माहिती अशी की, नगर परिषद बीड मध्ये तात्कालीन मुख्याधिकारी उत्कर्ष सोपानराव गुट्टे, सेवानिवृत्त निर्मळ जैन नगर रचनाकार, सय्यद सलीम सय्यद याकुब यांनी संगणमत करुन गुंठेवारी, लेआऊट, बांधकाम परवानगी बांधकाम पूर्णतेचा दाखला देवुन लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला असल्या बाबतचे पुरावे शासन, प्रशासनाकडे अर्जासोबत सादर करुन ही प्रशासन मधले लोक त्यांना पाठीशी घालत आहे म्हणून दि.२५ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालया समोर अमरण उपोषण करणार होते.मा. जिल्हाधिकारी साहेबांनी संबंधीत विभागास आदेश देताच प्रशासन जागे झाले आणि बलभी कॉलेज समोरील अनाधिकृत बांधकामसाठी खोदलेले खड्डे भरण्याचे आदेश स्वच्छता निरक्षकांना मुख्याधिकारी यांनी दिले. बलभीम चौक येथील अनाधिकृत बांधकाम धारकांना मुख्याधिकारी यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ नुसार नोटीस दिली आहे. तसेच यशवंतराव चव्हाण नाट्यगृहा समोरील आणि अनाधिकृत बांधकाम, कारंजा टॉवर जवळील कॉम्प्लेक्सचे अनाधिकृत कर आकरणी संबंधीचे संचिका सादर करण्याचे कळविले आहे.

तसेच न.प. बीड मधील नौकर भरती पदोन्नती मधील भ्रष्टाचार चौकशी संबंधी श्रीमती प्रियंका टोंगे, मुख्याधिकारी न.प. अंबाजोगाई व श्री पोपट निगळ, मुख्याधिकारी न.प. वडवणी यांना चाकशी समितीत घेवुन वीस दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहे. सर्वे नं. १०८, ११९ तरफ गिराम बीड मधील रद्द झालेले लेआऊट मधील अनाधिकृत बांधकाम थांबविणे व पी.टी.आर वरील नावाची नोंद रद्द करणे बाबत अहवाल सादर करण्याचे कळवले. मा.जिल्हाधिकारी साहेब बीड यांच्याशी चर्चा होऊन त्यांचे वरील आदेशांला मान देवुन मी माझे दि.२५ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालया समोरील अमरण उपोषण तुर्त मागे घेत असल्याचे समाजसेवक मुकरमजान पठाण यांनी आपले पत्रकात म्हणटले आहे.

पान ६ वरून...

### निवडणूक आयोगाची भूमिका

निवडणूक आयोगाला दिलेले अधिकार आबादित राखून निवडणुका पारदर्शक होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील वाढलेली मतांची टक्केवारी संशयास्पद असुन दुपारी पाच नंतर ७६ लाख मते वाढली कशी? हा महाराष्ट्रातील जनतेला पडलेला प्रश्न असुन याचे उत्तर अद्याप निवडणूक आयोगाने दिलेले नाही. निवडणूकितील पक्षपात थांबवुन निवडणुका पारदर्शक व्हाव्यात. निवडणूक आयोग भाजपच्या हिताचे काम करत असुन ते लोकशाहीला घातक आहे. निवडणूक आयोगाने निःपक्ष निवडणुका घेवुन जनतेची विश्वासार्हता जोपासावी असेही ते म्हणाले यावेळी प्रविणकुमार शेप, डॉ. दिलीप मोटे, गणेश राऊत, संभाजी जाधव, ऍड. प्रकाश मुंडे, विष्णु मस्के, शेख मोहसीन, गणेश जवकर, शेख फरहान,शामसुंदर जाधव, जयप्रकाश आघाव, भैया गोरे, बळीराम गिरम आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### आंतरराष्ट्रीय सहकार परिषद

सहाय्यक निबंधक सहकार अधिकारी आणि सर्व सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष संचालक व कर्मचारी तसेच नागरी सहकारी बँकांचे अध्यक्ष, संचालक व कर्मचारी, नागरी व मल्टीस्टेट पतसंस्थांचे अध्यक्ष, कर्मचारी आणि संचालक मंडळ तसेच सेवा सहकारी सोसायटीचे सचिव आणि मार्केट कमिटीचे सर्व संचालक व कर्मचारी यांच्या वतीने देखील सहकार दिंडी काढून या दिंडीचे स्वागत केले जाणार असल्याची माहिती बीड जिल्हा फेडरेशनचे अध्यक्ष कचरू लालजी सारडा तसेच सहकार अधिकारी संतोष भंडारी यांनी दिली आहे.

सहकार परिषदे निमित्त अंबाजोगाई शहरात येणाऱ्या सहकार दिंडीच्या स्वागतासाठी नुकतीच एक बैठक संपन्न झाली. दिंडीच्या स्वागत बैठकीसाठी आधार मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष ऍड सुनील सौंदरमल, संध्या मल्टीस्टेटचे अध्यक्ष जगताप साहेब, एसएनएस पतसंस्थेचे अध्यक्ष नाथराव रेड्डी, राजर्षी शाहू पतसंस्थेचे अध्यक्ष राजू मोरे, आधारचे संचालक प्रा. डी.जी धाकडे, डॉ. कमलाकर कांबळे, येडेश्वरी पतसंस्थेचे अध्यक्ष गोविंद येडे त्याचबरोबर अंबाजोगाई शहरातील विविध पतसंस्थांचे अध्यक्ष संचालकांसह अनेक संस्थांचे व्यवस्थापक मोठया संख्येने उपस्थित होते.

### शासनाच्या योजनेतून व्यवसाय

अत्यंत चांगली संधी विद्यार्थ्यांना या कोर्स च्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे या योजनेच्या माध्यमातून आपण आपले जीवन बदलण्यासाठी प्रयत्न करावेत ग्रामीण भागाचा चेहरा मोहरा बदलायचा असेल तर शासनाने उपलब्ध करून दिलेल्या संधी चे सोने करावे याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष तथा सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी संस्थेच्या कार्याविषयी माहिती देत या कोर्सच्या माध्यमातून आपण उद्योजक होणार आहात पण प्रामाणिक पणा आपल्या असू द्या असे म्हटले या प्रसंगी संस्थेचे नोडल ऑफिसर विठ्ठलराव गुंजाळ,पत्रकार संतोष सानप, मुजाहिद पठाण संस्थेच्या कोऑर्डिनेटर विद्या पोकळे यांच्यासह कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

### १०००८ श्री स्वामी चरित्र

कळंब, अकलूज, माळशिरस, सावदा, सोलापूर,बनसारोळा,या ठिकाणाहुन ६५० सेवेकरी आले होते.या ठिकाणी १०५८ पाठ पूर्ण झाले.रविवारी स्वामी चरित्र सारामृताचा याग संपन्न झाला. महाप्रसादाने यांची पारायणाची सांगता करण्यात आली.

या सेवेच्या यशस्वीतेसाठी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कृपाशीर्वादाने परमपूज्य गुरूवर्य श्री.समीर(दादा) भास्करे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवीण बासटवार,डॉ.अभिजीत चव्हाण,विजय चव्हाण,बालाजीउमनवार,अनिकेत पवार,सौरभ कासवेकर,भगवान सवूळकर,रोहन गडदे,श्रध्दा भास्करे,संगिता सौदागर,सिता गडदे,पुष्पलता कराड,पुष्पा बो-हाटे,पल्लवी धोकटे,मिना कदम, जान्हवी पतंगे,सागर महामुनी,अश्विनी महामुनी यांनी परिश्रम घेतले.

## नवगण माध्यमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**जालना । प्रतिनिधी**

नवगण माध्यमिक विद्यालय चितळी-पुतळी येथे पार पडलेल्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा हा वृत्तांत खूपच प्रेरणादायी आणि उत्साहवर्धक पार पडला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री.डॉ. आप्पासाहेबजी कदम, प्रमुख अतिथी म्हणून मोजपूरी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक श्री.मिथुन घुगे,श्री.अमोलजी कदम चितळी-पुतळी केंद्राचे प्रमुख श्री.अरूणजी जाधव, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष श्री.मंगेशजी जैवाळ,नवगण माध्यमिक विद्यालय चितळी-पुतळीचे मुख्याध्यापक श्री.बी.एस.मुळे आदींची उपस्थिती होती.श्री. अमोल कदम यांनी मुलींना मंत्रालय व विधानभवन दाखविण्याची केलेली घोषणा अत्यंत स्तुत्य आहे. यामुळे विद्यार्थिनींना शासनव्यवस्था आणि लोकशाही प्रक्रिया यांविषयी प्रत्यक्ष अनुभव घेता येईल, जो त्यांच्या शैक्षणिक प्रवासात महत्त्वपूर्ण ठरेल.विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाट्यछटा, नृत्याविष्कार आणि कलागुणांवर आधारित कार्यक्रमांनी पालकांच्या मनावर गारूड केले असावे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांच्या कलागुणांना चालना मिळते.शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, तसेच पालकांनी दिलेल्या सहभागामुळे कार्यक्रम यशस्वी झाला.



## प्राजक्ता पाटील राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगाव येथील केंद्रीय जि.प.शाळेतील सहशिक्षिका श्री. प्राजक्ता पाटील यांना नुकतेच मैत्रा फाउंडेशनच्या वतीने त्यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराने देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे.

शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यां शिक्षकांना सेवाभावी मैत्रा फाउंडेशनच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करतात त्याचप्रमाणे यावर्षी त्यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्या केल्या शिक्षकांचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला असुन यामध्ये युसूफवडगाव येथील केंद्रीय जि.प शाळेतील सहशिक्षिका श्रीमती प्राजक्ता पाटील यांना त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते मैत्रा फाउंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षिक पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून खटोड प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतमजी खटोड तर प्रमुख पाहुणे म्हणून संग्रामजी धनवे,दिनेशजी पवार,अनिल जाधवर,राजू वंजारे,हर्षा ढाकणे,संगीता आदमाने हे प्रमुख अतिथी उपस्थित होते.



यावेळी मैत्रा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री द.ल.वारे,उपाध्यक्ष शितल गायकवाड,माधुरी कोठुळे,उज्वला वनवे,सरिता नाईकवाडे, जिल्हाध्यक्ष संजय राठोड,उपाध्यक्ष श्रीमती संगीता आदमाने,योगेश सोळसे,बापू धनवे,तानाजी सोनवणे,आशा घेतल,अंकुश नागरगोजे,विकास घोडके, अमोल राठोड,आशा भारती, खाडे,उषा लोंढे हे उपस्थित होते.

## मतदानाच्या अधिकाराची प्रत्येक युवकांनी जाणीव ठेवून मतदान करून लोकशाही मजबूत करावी-प्राचार्य डॉ.विश्वासराव कदम

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील तहसील कार्यालय पाटोदा निवडणूक निर्णय अधिकारी पाटोदा व जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग व लोक प्रशासन विभागाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा करण्यात या दिनाचे अवचित्य साधून महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ विश्वासराव कदम कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर अशोक देवगुडे डॉक्टर शिवाजीराव काकडे डॉक्टर वंदन राव जाधव अंतर्गत मूल्यमापन कक्षाचे समन्वय प्राध्यापक विनोद किर्दक सर व्यासपीठावर उपस्थित होते सर्वप्रथम भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून या कार्यक्रमाची सुरुवात झाली यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी यांना मतदान दिनाची प्रतिज्ञा सादर करण्यात आली ही प्रतिज्ञा कुमारी आकांक्षा हिने वाचन केले यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला सत्कार कार्यक्रमानंतर या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक डॉक्टर लोखंडी बी बी यांनी



केले राष्ट्रीय मतदार दिन हा का महत्त्वाचा आहे भारतीय लोकशाही मजबूत करण्यासाठी आपल्याला दिलेल्या हक्काची जाणीव करून देण्यासाठी आजचा दिवस महत्त्वाचा असल्याचे प्रस्ताविकात विशद केले तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ विश्वासराव कदम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आपल्या देशात शेकडो वर्षे गुलामगिरी होती स्वातंत्र्यानंतर आपल्या देशात लोकशाही शासन व्यवस्थेचा पुरस्कार करून सर्व जनतेला मतदानाचा अधिकार राज्यघटनेच्या तरतुदीनुसार देण्यात आला सर्व उच्च सत्ता ही लोकांच्या हाती असून आपल्याला मिळालेल्या हक्काची जाणीव ठेवून आपण लोकशाही मजबूत केले पाहिजे असे आव्हान त्यांनी विद्यार्थ्यांना केले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ रावजी घाडगे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी जो आपल्याला संविधान आणि दिलेला मतदानाचा अधिकार आहे याची आपण जाणीव ठेवून कर्तव्यदक्ष देशाचे नागरिक बनले पाहिजे आपले हक्क आणि अधिकार अबाधित ठेवण्यासाठी नवयुवकांनी मतदान करून लोकशाही मजबूत करण्याचे आव्हान केले या कार्यक्रमाचे आभार डॉक्टर शिवाजीराव काकडे यांनी केले तर सूत्रसंचालन प्राध्यापक डॉक्टर लोखंडे बीबी यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉक्टर वंदनराव जाधव प्राध्यापक संदीप किवने सर यांनी मोलाचे सहकार्य केले राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने राज्यशास्त्र विभागाच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले यशस्वी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात येणार आहे या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

cmyk

# सोयाबीन खरेदीला मुदतवाढीची गरज; निम्मे शेतकरी खरेदीच्या प्रतिक्षेत

पुणेः राज्यातील नोंदणी केलेले जवळपास ४ लाख शेतकरी खरेदीची प्रतिक्षेत आहेत. तर २४ जानेवारीपर्यंत केवळ ७ लाख ५४ हजार टन सोयाबीनची खरेदी झाली. सोयाबीन खरेदीची मुदत ३१ जानेवारीपर्यंत आहे. पण या मुदतीत नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची खरेदी होऊ शकणार नाही किंवा उद्दीष्ट पूर्ण होणार नाही. त्यामुळे सरकारने सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

सरकारने पहिली मुदत संपल्यानंतर राज्यात सोयाबीन खरेदीसाठी ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. तर राज्यात यंदा १४ लाख १३ हजार टन सोयाबीन खरेदीचे उद्दीष्ट आहे. तर पहिल्या टप्प्यातील उद्दीष्ट १० लाख टन दिले आहे. पहिल्या टप्प्यातील उद्दीष्ट पूर्ण झाल्यानंतर पुन्हा उद्दीष्ट वाढवून देऊ, असे सरकारने म्हटले आहे. राज्यात



२४ जानेवारीपर्यंत ७ लाख ५४ हजार नट सोयाबीनची खरेदी केली. ही खरेदी पहिल्या टप्प्यातील उद्दीष्ट्या तुलनेत ७५ टक्के आहे. तर एकूण उद्दीष्टाच्या तुलनेत केवळ ५३ टक्के आहे.

म्हणजेच अजूनही खरेदी उद्दीष्टापासून लांबच आहे.

राज्यात खरेदी सुरु होऊन आता १०२ दिवस पूर्ण झाले. पण यापैकी खरेदी सुरळीत चालेले दिवस निम्मेच असतील, असे खरेदी केंद्र चालकांनी सांगितले. त्यामुळेच या १०२ दिवसांमध्ये राज्यात राज्यात केवळ ३ लाख ६० हजार शेतकऱ्यांच्याच सोयाबीनची खरेदी होऊ शकली. तर ४ लाख शेतकरी आजही खरेदीची वाट पाहत आहेत. तर केवळ ७ लाख ५४ हजार टनांचीच खरेदी झाली. आता ३१ जानेवारीपर्यंत ४ लाख शेतकऱ्यांच्या सोयाबीन खरेदीचे उद्दीष्ट आहे. पण या शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी होणारच नाही. अनेक शेतकऱ्यांना वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करण्यासाठी मुदतवाढ देण्याची गरज आहे. खरेदीला आणखी महिनाभराची मुदतवाढ द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

# भोपळा वर्गीय भाज्यांवरील मुख्य कीटक आणि रोग



भोपळा वर्गीय भाजीपाला विचारात घेतला की, समोर भोपळ्यासारख्या गोल भाज्या येतात. भोपळा वर्गीय भाजीपाला प्रामुख्याने भोपळा, तिखट, लौकी, काकडी, लुफा, पेठा, परवल आणि काकडी इत्यादी कोणत्या वर्गात पडतात मुख्य भोपळे आणि भोपळा वर्गीय भाज्यांचे मुख्य रोग साधारण पुढीलप्रमाणे आहेत.

लाल भोपळा बीटल : भोपळा भाजीपाला किडी जो प्रामुख्याने भोपळा वर्गाच्या पिकावर हल्ला करतो तो लाल भोपळा बीटल आहे. या लाल रंगाच्या झाडाची पाने लवकर टप्प्यात खाल्ल्याने नष्ट होते, त्यामुळे पिकाची वाढ थांबते. जैविक नियंत्रण कारण्यासाठी अर्धा कप लाकूड राख आणि अर्धा कप मिसळा आणि निवडले की अर्धा कप लिटर पाण्यात काही तास सोडा. शेतात फवारणीपूर्वी काही संक्रमित पिकावर फवारणी करावी. दुसरा पर्याय म्हणून, ५% एनएस साबणाने मिसळला जाऊ शकतो आणि ७ दिवसांच्या अंतराने वापरला जाऊ शकतो.

फळांची माशी : फळांची माशी ही मादी कीटक फळांच्या आत अंडी घालते, नंतर अळ्या हळूहळू फळात बोगदा बनवितात आणि लगदा खाण्यास सुरवात करतात, ज्यामुळे फळ सडणे, विकृत होणे चालू होते. यावर प्रतिबंध करताना शेतातील तण नष्ट करा. मक्याची काढणी चारी बाजूंनी करावी कारण माशीला उंच ठिकाणी बसायला आवडते. ज्यावर मालाथिऑन ईसी एमएल प्रमाणात अर्धा केजी चांगले आणि २ लिटर पाण्यात फवारणी केली जाते. पांढरी माशी : हा किटक पांढरा पंख आणि पिवळ्या रंगाचा आहे, ही माशी एका मिलीमीटरपेक्षा लहान आहे. ही माशी झाडाच्या पतीवर बसून रस शोषून घेते, लाळ तेथेच ठेवते, रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. यावर प्रतिबंध करताना कीटकांना आकर्षित करण्यासाठी पिवळ्या रंगाचे सापळे आणि चिकट टॅग वापरा. शिकारी पक्ष्यांना आकर्षित करण्यासाठी टी आकाराच्या बांबूचे खांब प्रति एकर १ नग वापरा. प्रति किलो बियाणे इमिडाक्लोप्रिड ७० डब्ल्यूएस १० ग्रॅम वापरल्याने चांगला फायदा होईल.

माइट बारुथी : हा किडा उघड्या डोळ्यांनी पाहणे शक्य नाही, एका ठिकाणी तो कळपात मोठ्या संख्येने असतो आणि उन्हाळ्यात काकडीसारख्या पिकांमध्ये जास्त प्रादुर्भाव होतो, याचा प्रादुर्भाव झाल्यामुळे झाडे त्यांचे अन्न बनवण्यास असमर्थ आहेत. यावर प्रतिबंध करण्यासाठी, पॉवर फवारणी यंत्राद्वारे फवारणी केल्यास कोळी पिकापासून विभक्त होते, ज्यामुळे उद्रेक कमी होतो. स्पिरोमासिफेन ९ एससी ०.८ मिली प्रति लीटर किंवा डायकोफल १८.५ ई सी ५ मिली प्रति लिटर किंवा फेनप्रोथ्रीन ३० ईसी ०.७५ ग्रॅम प्रति लिटर १० ते १५ दिवसांच्या अंतराने शिंपडा जेणेकरून याचा प्रादुर्भाव कमी होऊ शकेन.

# कोंबड्यांना येणारा ताण; कारणे आणि उपाय

अंतर्गत शारीरिक कार्य सामान्यपणे करण्यासाठी कोंबड्या विविध वर्तणूक आणि चयापचय यंत्रणा वापरते, यालाच कोंबड्यातील ''ताण'' असे म्हणतात. व्यावसायिक कोंबडी पालनातील कोंबड्यांना अशा परिस्थितीचा सामना करावा लागतो. कोंबडीच्या ताणाचा कळपाच्या एकूण आरोग्यावर आणि उत्पादकतेवर लक्षणीय परिणाम होतो. त्यामुळे तणाव निर्माण करणारे घटक समजून घेणे गरजेचे आहे. हे घटक ओळखणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे हा यशस्वी पोल्ट्री उत्पादनाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

कोंबड्यांना ताण येण्याची विविध कारणे :

अचानक हवामानातील बदलामुळे कोंबड्यांना ताण येऊ शकतो आणि प्रतिकारशक्ती कमकुवत होऊ शकते आणि ते संवेदनशील बनतात. वेगवेगळ्या कारणांमुळे कोंबड्या पुरेशा प्रमाणात आहार घेत नसतील तर ताण येऊ शकतो. खाद्य, आहारात पुरेशा पोषक तत्वांचा अभाव किंवा इतर घटक यामुळे सुद्धा ताण येतो. वजन वाढणे, कमी होणे किंवा वृद्धत्व यासारख्या घटनांमुळे तणाव निर्माण होतो. कोंबड्यांना पकडताना, विशिष्ट औषधे देताना किंवा एका ठिकाणाहून दुसर्या ठिकाणी नेले जाते, तेव्हा त्यांना भावनिक ताण येतो. रोग बरा करण्यासाठी दिलेल्या औषधांमुळे आणि कालावधीमुळे देखील ताण येऊ शकतो.

कोंबड्यांचे ताण घालवण्यासाठी उपाय योजना :

कोंबड्यांमधील ताण घालवण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी प्रत्येक कोंबडीला किती जागा लागते हे पाहून आपल्याजवळील उपलब्ध जागेनुसार एकूण कोंबड्यांची संख्या ठरवावी. तुमच्याकडे उपलब्ध असलेल्या जागेच्या आधारे कोंबडीची एकूण संख्या निश्चित करा. लहान जागेत जास्त गर्दी केल्याने वातावरणातील अमोनियाचे प्रमाण वाढते. शिवाय पक्षी एकमेकांच्या सानिध्यात असल्याने रोगाचा प्रादुर्भाव लवकर होतो. यावर उपाय म्हणून लिटरची स्वच्छता करावी. पावसाळ्यात आणि जास्त आर्द्रता असताना लिटर कोरडे ठेवावे. वातावरणातील बदलानुसार शेडमध्ये पडदे लावणे, पोती बांधणे या गोष्टींची वेळेवर काळजी घ्यावी. ताण घालवणारे औषधे तज्ज्ञांच्या सल्ल्याने द्यावीत. आहारातून किंवा पाण्यातून जीवनसत्वांचा पुरवठा केल्यास ताण कमी होतो. कोंबड्यांना ताण असताना त्यांना लसीकरण करू नये. प्रथम कोंबड्यांवरील ताण कमी करावा आणि नंतरच लसीकरण करावे.



## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### भारतीय प्रजासत्ताक दिन – भारत

### महत्वाच्या घटना

१५६५ : विजयनगर साम्राज्य आणि दख्खनचे सुलतान यांच्यात तालिकोटा येथे लढाई झाली. या लढाईत रामरायाचा पराभव होऊन दक्षिण भारतात अनिर्बंध मुस्लिम सत्तेला सुरूवात झाली.
१६६२ : लोहगड-विसापूर आणि तिकोना या किल्ल्यांच्या परिसरात मुघल फौजांच्या चढाया
१८३७ : मिचिगन हे अमेरिकेचे २६ वे राज्य बनले.
१८७६ : मुंबई आणि कलकत्ता दरम्यान रेल्वे वाहतुकीस सुरूवात झाली.
१९२४ : रशियातील सेंट पीट्सबर्गचे लेनिनग्राड असे नामकरण करण्यात आले.
१९३३ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने वसाहतीच्या स्वराज्याऐवजी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करून २६ जानेवारी हा स्वातंत्र्यदिन मानण्याला सूरुवात केली. स्वातंत्र्यदिन साजरा केल्याने देशात धरपकड झाली. पुढे प्रत्यक्षात १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाल्याने २६ जानेवारी १९५० या दिवशी प्रजासत्ताक राज्यपध्दती स्वीकारली जाऊन तो दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा होऊ लागला.
१९४२ : दुसरे महायुद्ध अमेरिकन फौजांचे युरोपातील नॉर्दन आयर्लंड येथे आगमन
१९५० : एच. जे. कनिया यांनी भारताचे पहिले सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९५० : भारताची राज्यघटना अस्तित्त्वात आल्याने भारत हे सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्र बनले. भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांचा शपथविधी झाला.
१९७८ : महाराष्ट्रात रोजगार हमी कायदा सुरू
१९९८ : कॅप्टन लक्ष्मी व उषा मेहता यांना 'पद्मविभूषण' पुरस्कार प्रदान
२००१ : गुजरातमधील कच्छ भागात झालेल्या मोठ्या भूकंपात सुमारे २०,००० लोक ठार झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८९१ : 'चंद्रशेखर' शिवराम गोर्हे बडोद्याचे राजकवी, 'गोदागौरव' आणि 'कविता रति' ही त्यांची विशेष गाललेली काव्ये आहेत. (मृत्यू: १७ मार्च १९३७)
१९२१ : अकिओ मोरिटा सोनी कार्पोरेशनचे संस्थापक (मृत्यू: ३ आक्टोबर १९९९)
१९२५ : पॉल न्यूमन अभिनेता, दिग्दर्शक व रेस कार ड्रायव्हर (मृत्यू: २६ सप्टेंबर २००८)
१९५७ : शिवलाल यादव क्रिकेटपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७३० : कवी श्रीधर यांनी समाधि घेतली (जन्म)
१८२३ : एडवर्ड जेन्नर देवीची लस शोधून काढणारे संशोधक व डॉक्टर (जन्म: १७ मे १७४९)
१९५४ : मानवेंद्रनाथ रॉय देशभक्त, क्रांतिकारक व भारतातील कम्यूनिस्ट पक्षाचे संस्थापक (जन्म: २१ मार्च १८८७)
१९६८ : लोकनायक माधव श्रीहरी तथा 'बापूजी' अणे (जन्म: २९ ऑगस्ट १८८०)
२०१५ : रासीपुरम कृष्णस्वामी तथा आर. के. लक्ष्मण व्यंगचित्रकार, पद्मभूषण (१९७१), रॅमन मॅगसेसे (१९८४), पद्मविभूषण (२००५) इत्यादि पुरस्कारांचे मानकरी (जन्म: २४ आक्टोबर १९२१)

## शेतकऱ्यांच्या फायद्याची प्लास्टिक मल्चिंग अनुदान योजना



राष्ट्रीय फलोत्पादन अंतर्गत प्लास्टिक मल्चिंग अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत फळझाडांना, पालेभाज्या पिकांसाठी मल्चिंग म्हणून वापरण्यात येणारी प्लास्टिक फिल्मयावर अनुदान दिले जात आहे. पिकात मल्चिंगचा वापर केल्यामुळे जमिनीतील पाण्याचे बाष्पीभवन टाळले जाऊ शकते. पिकामध्ये तणांची वाढ देखील ही त्यामानाने कमी होते. त्यामुळे प्लास्टिक मल्चिंग पेपरचा उपयोग हा फळझाडांच्या आणि पालेभाज्यांची पिके घेताना केला जातो. यावर अनुदान हे सर्वसाधारण क्षेत्रासाठी प्रति हेक्टर रुपये ३२,००० असून या खर्चाच्या ५० टक्के म्हणजेच जास्तीत जास्त १६,००० रुपये प्रति हेक्टर याप्रमाणे कमाल दोन हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंतच अनुदान देय आहे. जर डोंगराळ क्षेत्र असेल, तर प्रति हेक्टर हे ३६,८००/- रुपये मापदंड असणार आहे. या खर्चाच्या ५० टक्के म्हणजेच जास्तीत जास्त १८,४००/- रुपये प्रति हेक्टर याप्रमाणे दोन हेक्टर क्षेत्र मर्यादितसाठी अनुदान देय असणार आहे.

आवश्यक पात्रता काय?

शेतकरी, बचत गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी समूह याशिवाय सहकारी संस्था या योजनेमध्ये सहभागी होऊन अर्थसहाय्य घेऊ शकतात. प्लास्टिक मल्चिंग अनुदान योजना २०२४ आवश्यक कागदपत्रे आधार कार्डची छायाप्रत, आधार संलग्न असलेल्या बँक खात्याच्या पासबुकची झेरॉक्स, ७/१२ उतारा. ८-अ प्रमाणपत्र.

प्लास्टिक मल्चिंग अनुदान योजनेसाठी कोठे अर्ज करावा? या योजनेच्या अधिक माहितीसाठी कृषी सहाय्यक, तालुका कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक मंडळ, कृषी अधिकारी, यांच्याशी संपर्क करावा. या योजनेची अधिक माहिती मिळवावी. विविध पिकांकरिता कोणती प्लास्टिक फिल्म वापरावी? ज्या पिकांना ११-१२ महिने कालावधी लागतो. म्हणजे उदाहरणार्थ पपई यांसारख्या फळपिकांना ५०मायक्रोन जाडीची यु व्ही प्लास्टिक फिल्म वापरली जाते. ३-४ महिन्याच्या कालावधीत येणारे पिकांसाठी म्हणजेच उदाहरणार्थ भाजीपाला, स्ट्रॉबेरी इत्यादींसाठी २५ मायक्रोन जाडीची यूवी स्टॅबिलायझर फिल्म वापरली जाते. जास्त कालावधी घेणारी पिके म्हणजेच १२ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी घेणाऱ्या सर्व पिकांसाठी १०० किंवा २०० मायक्रॉन जाडीची यु व्ही स्टॅबिलायझर प्लास्टिक फिल्म वापरली जाते.

# पिकाच्या जोमदार वाढीसाठी असा करा खतांचा वापर

उत्पादनवाढीसाठी आपण जी खते पिकाला देत असतो ती खते पिकांकडून पूर्णपणे शोषली जात नाहीत. पिके त्यातील काही अंशच शोषून घेतात. उरलेली खते पाणी, हवा आणि तापमानामुळे वाया जातात. पिकाला दिलेली खतेलागू होण्यासाठी ती योग्य प्रकारे दिली गेली पाहिजेत त्यासाठी कोणते उपाय करायचे याविषयीची माहिती असणे गरजेचे आहे.

पिकाला दिलेल्या एकूण खताच्या प्रमाणापैकी जो काही अंश पिके शोषण करतात आणि त्यामुळे जी उत्पादनात वाढ होते, त्याला 'खत वापराची कार्यक्षमता' म्हणतात. माती परीक्षणाच्या आधारावर पिकांना द्यायची खतमात्रा ठरवावी लागते. त्यामुळे पिकाला गरजेइतक्याच खतांचा पुरवठा केला जातो. संतुलित खत वापरामुळे उत्पन्नात वाढ होते. जमिनीचे आरोग्य चांगले राहते. पिकांना रासायनिक खतांद्वारे विविध पोषक अन्नद्रव्यांचा म्हणजेच नत्र, स्फुरद, पालाश, सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खतांचा पुरवठा केला जातो.

खतांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी उपाय : सुरुवातीला खते देताना जमिनीत नेहमी पुरेसा ओलावा असतानाच खते द्यावीत. पिकाला माती परीक्षण करुनच शिफारशींनुसार खते देण्याच नियोजन करावं. कारण माती परिक्षणामुळे आपल्या जमिनीत कोणत्या अन्नद्रव्याची कमरता आहे याची माहिती



कळते. काही शेतकरी पिकाला खते फेकून देतात. पण खते फेकून दिल्यामुळे ती मोठ्या प्रामाणात वाया जातात. त्यासाठी पेरणी करताना खते बियाण्याखाली पेरून द्यावीत. खताचे डोस विभागून देताना ती मुळांच्या सान्निध्यात द्यावीत त्यामुळे खते वाया न जाता ती पिकाला लागू पडतील. खतांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी बाजारात आवरण असलेली खते/ब्रिकेट्?स/सुपर ग्रॅन्युलस उपलब्ध आहेत. त्यांचा वापर करावा. पिकाला युरिया देताना तो निंबोळी पेंडीसोबत १५: या प्रमाणात द्यावा त्यामुळे युरिया वाया जाणार नाही. पिकांच्या वाढीच्या संवेदनशील अवस्थेत खते विभागून द्यावीत. द्रवरुप जी खते आहेत त्याचा वापर ठिबक सिंचनाने करावा. पाण्याचा जास्त वापर करण टाळावं त्यामुळे खते पाण्यासोबत वाहून जातात.

तृणधान्य पिकांसाठी नत्र, स्फुरद, पालाश आणि गंधक या खतांचा वापर ४:२:२:४ या प्रमाणात, तर कडधान्यासाठी १:२:१:१ या प्रमाणात वापर करावा. सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर हा फवारणीद्वारे करावा. पिकाच्या काढणीनंतर उरलेले अवशेष न जाळता शेतातच कुजतील यासाठी उपाय करावेत. याशिवाय जमिनीची सुपिकता वाढविण्यासाठी हिरवळीची खते, शेणखत, कंपोस्ट खतांचा वापर करणंही गरजेच आहे. त्यामुळे खते रासायनिक खते लागू पडण्यास मदत होते. सेंद्रिय खतांचा नियमित वापर केल्यास जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ दरम्यान येण्यास मदत होते. रायझोबियम, पीएसबी, अॅझोटोबॅक्टर यासारखी जिवाणू खतेही वापरावीत जमीन जर क्षारयुक्त किंवा चोपण झाली असेल तर अशा जमिनी सुधारण्यासाठी भूसुधारक खतांचा वापर केला जातो. यामध्ये जिप्सम, सेंद्रिय खते, पेंडीची खते, प्रेसमड, उसाची मळी यासारख्या खतांचा वापर केला जातो. चुनखडीविरहित जमिनीमध्ये जिप्समचा वापर करावा. शेतात मृदा आणि व जलसंधारणाच्या उपाययोजना कराव्यात.त्यामुळे जमिनीवरून वाहून जाणारे पाणी ठिकठिकाणी थोपविले जाऊन पाणी मुरण्याची क्रिया वाढून ओलावा साठविण्यास मदत होते. अशा प्रकारे आपण दिलेल्या खतांचा योग्य वापर होऊन खते वाया जाणार नाहीत.

# बिंदुसरा नदीपात्रात बांधलेला वॉकिंग ट्रॅक पुढारी पोसण्यासाठी की बांधकाम अतिक्रमणासाठी?

## नगरपालिकेच्या आशिर्वादाने बिंदुसरा नदीचा ओढा झाला





बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील बिंदुसरा नदीच्या बाजूने नागरिकांसाठी जनतेच्या पैशातून लाखो रुपये खर्चून '' वॉकिंग ट्रॅक '' तयार करण्यात आलेला आहे.परंतु सद्यस्थितीत या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कचरा टाकण्यात येत असल्याने रस्त्याचा वापर करण्यात येत नाही त्यामुळे हा नगरीकांसाठी कि पुढारी यांचे कार्यकर्ते पोसण्यासाठी की भुमाफियांना अतिक्रमित बांधकाम करता यावे यासाठी आहे ?असा सवाल सामाजिक कार्यकर्यांनी नगरपरिषद प्रशासनाला विचारला असुन संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांच्या मार्फत नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे, सचिव, नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांना केली आहे.

बीड शहरातील बिंदुसरा नदीच्या बाजूने नागरिकांसाठी लाखों रुपये खर्चून वॉकिंग ट्रॅक तयार करण्यात आला होता. परंतु सद्यस्थितीत या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर कचरा टाकण्यात येत असल्याने या रस्त्याचा वापरच करण्यात येत नाही या ठिकाणी कचऱ्यांचे मोठमोठे ढीग साचल्याने हा रस्ता संपूर्णपणे कचऱ्याने व्यापलेला आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहरातील मोंढा रोड लगत वास्तव्यास असलेल्या नागरिकांना चालण्यासाठी बिंदुसरा नदीच्या कडेने नगरपालिकेने १० फुटी रस्ता तयार केला आहे. यासाठी लाखो रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. नागरिकांना सकाळी मॉर्निंग वॉक करता यावा तसेच मोंढा रोड ते सुभाष रोड पर्यंत चालत जाता यावे यासाठी बिंदुसरा नदीच्या पात्राशेजारी हा ट्रॅक तयार करण्यात आला. परंतु नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे सद्यस्थितीमध्ये हा रस्ता कचऱ्याने व्यापलेला आहे बाजूच्या शेतातील पाणी येऊन सगळीकडे चिखल या रस्त्यावर झालेला आहे .

बीड शहरातील कचरा व्यवस्थापन सुरळीत राहावे यासाठी नगरपालिके कडून नाळवंडी रोड भागात मोठमोठ्या खदानी तयार करण्यात आलेल्या आहेत. परंतु पालिकेच्या गाड्या ज्या शहरातील कचरा गोळा करतात त्यांच्याकडून नदी पात्रताच कचरा टाकण्यात येत असल्याचे वारंवार समोर आलेले आहे .परिणामी प्रचंड दुर्गंधी आणि घाण या रस्त्यावर कायम असते. त्यामुळे नागरिकांच्या सुविधेसाठी तयार करण्यात आलेल्या या रस्त्यासाठी खर्च करण्यात आलेल्या लाखो रुपये कचऱ्यातच गेले असल्याचे चित्र आहे. सकाळी चालल्याने माणसांचे आरोग्य चांगले राहते या नावाखाली नागरीकांसाठी सुविधा म्हणून मॉर्निंग वॉक ट्रॅक तयार करण्यात आला. मात्र जनतेच्या पैशातून बांधलेल्या या रस्त्यावर अतिक्रमण वाढण्याचा धोका असुन त्याची सुरुवात झालेली दिसुन येते.प्रथम नदीपात्रात भर टाकायची त्याठिकाणी जागा तयार करायची आणि नंतर प्लाटींग टाकून नदीपात्रातील जमिनीवर बांधकाम करुन विक्री करायची असा एकंदरीतच पायंडा पडलेला असुन यामध्ये नगर परिषद व जिल्हा प्रशासन यांची मिलिभगत दिसुन येत आहे.

## || थोडक्यात




### वसंतदादा पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा

पाटोदा : येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला. वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात तहसिल कार्यालय व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागांमार्फत आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटोद्याचे तहसिलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी मा. दत्तात्रय निलावाड होते. व्यासपीठावर नायब तहसिलदार (निवडणूक) मा. अभय जोशी, उपप्राचार्य प्रो. सतीश माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. रमाकांत वानखेडे यांनी राष्ट्रीय मतदार दिवसाचे महत्व विषद केले. याप्रसंगी कु. आरती देवकर या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. यानंतर मा. अभय जोशी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्व सविस्तर स्पष्ट केले. मा. दत्तात्रय निलावाड यांनी मतदार नोंदणी प्रक्रिया पूर्ण वर्षभर सुरु असते म्हणून वयाची १८ वर्षे पूर्ण करण्याऱ्या युवक युवतींनी आपले नाव मतदार यादीत नोंदवावे असे आवाहन केले. प्रो. सतीश माउलगे यांनी लोकशाही शासनप्रणालीत मतदानाचे महत्व विषद केले. कार्यक्रमाचे औचित्य साधून बीएलओ म्हणून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल तालुक्यातील शिक्षकांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लोकप्रशासन विभागप्रमुख प्रा. शरद पवार यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा. प्रदीप मांजरे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### संत भोजलिंग काका यांच्या मंदिराचे भूमीपूजन

बीड : संत ज्ञानेश्वर माऊली व त्यांची भावंडे यांचा संभाळ करणारे संत भोजलिंग काका पाटील यांच्या मंदिराच्या जागेचे भूमीपुजन भी ह.भ.प. बालाजी महाराज शास्त्री श्रीराम संस्थान निंतरखणीश्री ह.भ.प. उध्दव महाराज शास्त्री माऊली संस्थान नारायण वाडी ह.भ.प. वैजिनाथ महाराज सांगळे भारेश्वर डोंगरे संस्थान तरडगवडण ह.भ.प. कृष्णा महाराज हीच शरद में कुका जाहगीर दार दबा संस्थेचे अध्यक्ष महादेव राऊत यांच्या उप संपन्न झाले महाराष्ट्रात भोजलिंग काकावलियाचे हे पहिले मंदिर देणार संत ज्ञानेश्वर माऊली त्यांची भावडे यांचा संभाळ करणारे सल भोजलिंग काका पटिल यांचे मंदिर भूमा पुनना साठी परिसरातील सामस्था महिल व शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक वर्ग हजर होले

### सेवापूर येथे बाल आनंद नगरी

बीड : खंडुजी बाबा विद्यालय सैदापूर येथे लहान मुला मुली नी आनंद नगरी भरून अनंद साजरा केला भाजीपाला रनातील रानमेव आनुन अनंद साजरा केला परिसरातील ग्रामस्थ महिला यांनी अंनंद नागरी चा आनंद तसेच सर्व शिक्षक यांनी भाजीपाला खरेदी केला यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात व्यवहारी ज्ञान प्राप्त होते आनंद नागरी संपन्न करण्यासाठी शाळेतील शिक्षक श्री योगीराज सुतार यांनी अचूक परिश्रम घेऊन आनंद नागरी हा उपक्रम घेतला यासाठी सर्व शाळेतील शिक्षक व इतर कर्मचारी यांनी सहकार्य केलं संस्था अध्यक्ष महादेव राऊत व मुख्याध्यापक यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

## नवमतदार हे देशाचे भविष्य -जिल्हाधिकारी अविनाथ पाठक

### मतदार दिनानिमित्त निघाली रॅली

बीड। प्रतिनिधी

नवयुवक आणि नवमतदार येत्या काळात देशाचे भवितव्य आहेत त्यासाठी जनजागृती महत्वाची आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित रॅलीला हिरवी झेंडी दाखवून त्यांनी सुरुवात केली याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी शैलेश सुर्यवंशी, तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुरेंद्र डोके इतर अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे म्हणाले की, देश हा महासत्ता बनू पाहतोय राष्ट्रीय मतदार दिनाच्या जनजागृतीत नवयुवकांचा असलेला सहभाग पुढील निवडणूकीत बीडचे चित्र पालटून दाखवेल. या रॅलीला जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणातून सुरुवात होऊन शिवाजी पुतळा येथुन



समाज कल्याण कार्यालयाच्या प्रांगणात समारोप करण्यात आला. रॅलीच्या समारोप प्रसंगी चंपावती विद्यालयाची विद्यार्थीनी नम्रता तांबे म्हणाली की बीड जिल्हा हा आता केवळ उसतोड कामगारांचा जिल्हा राहिलेला नसून या जिल्हयाने उत्कृष्ट खेळाडू, उत्तम प्रकारचे अधिकारी निर्माण करुन बीड जिल्हयाला ख-या अर्थाने पुढे नेले असून आपली बीडकर अशी ओळख निर्माण करण्यासाठी प्रत्येक नागरिक आणि विद्यार्थ्यांनी दृष्टीकोण बदलला पाहिजे असे तीने आपल्या मनोगतात व्यक्त केले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी सन्मानचिन्ह देऊन नम्रता तांबे हिचा गौरव केला. राष्ट्रीय मतदार दिनाच्या रॅलीत विविध शाळेने उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व समारोप उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत प्रदीप अंबारे राज्यात प्रथम

बीड। प्रतिनिधी



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या महाराष्ट्र शासनाच्या फूड सेफ्टी ऑफिसर पदाच्या परीक्षेचा निकाला नुकताच जाहीर झाला असून यामध्ये प्रदीप वसंत अंबारे हा विद्यार्थी राज्यात प्रथम आल्याने पुन्हा एकदा आदित्य शिक्षण संस्थेचा अटकेपार झेंडा फडकल्याने प्रदीपचे संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी अभिनदंन केले.

आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाशिवाय स्पर्धा परिक्षा, विविध क्रीडा स्पर्धा, करिअर विषयी वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या फूड सेफ्टी ऑफिसर पदाची परिक्षा आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रवीण अंबारे याने परिक्षा दिली होती. प्रवीण अंबारे हा आदित्य शिक्षण संस्थेत २०१४ ते २०१७ या कालावधीत शिक्षण घेत होता. प्रदीप वसंत अंबारे हा आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचा पदवीधर आहे.'' अभ्यासूवृत्ती व मेहनतीच्या जोरावर त्याने हे यश खेचून आणले आहे.

## ऐतिहासिक बीबी का मकबरा मध्येही उर्दू भाषेसोबत सापत्न वागणूक- एस.एम.युसूफ़

बीड (प्रतिनिधी) - जिल्ह्याशेजारील औरंगाबाद आताचे छत्रपती संभाजीनगर येथे असलेल्या ऐतिहासिक बीबी का मकबरा मध्ये उर्दू भाषेतूनही माहिती फलक लावण्यात यावे अशी मागणी देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल, मुख्यमंत्री, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग नवी दिल्लीचे महासंचालक, औरंगाबाद कार्यालयाचे संचालक, मराठवाडा विभागीय आयुक्त, औरंगाबाद चे जिल्हाधिकारी, औरंगाबाद महानगरपालिकेचे आयुक्त, महापौर व विरोधी पक्षनेते यांना बीड जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि प्रसिद्ध गायक एम.एम.शेख यांनी पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.

याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, महाराष्ट्रातील आजच्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शहरात असलेला आपला ऐतिहासिक वारसा बीबी का मकबरा, जो सम्राट औरंगजेबाने शतकानुशतकांपूर्वी बनविलेला आहे. ही ऐतिहासिक वास्तू पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाकडून तीन माहिती फलक येथे लावण्यात आलेले आहेत. जे हिंदी, मराठी आणि इंग्रजी भाषांमध्ये आहे. हिंदी ही आपली राष्ट्रभाषा आहे असे आपण भारतीय मानतो. मराठी ही महाराष्ट्राची भाषा आहे. जी संपूर्ण महाराष्ट्रापेक्षा मराठवाड्यात जास्त वापरली जाते आणि इंग्रजी ही पाश्चात्य भाषा आहे. बीबी का मकबरामध्ये या तिन्ही भाषांमधील फलक लावण्यात आलेले आहेत. बीबी का मकबरा पाहण्यासाठी येणारे पर्यटक केवळ महाराष्ट्र आणि आपल्या भारत देशातूनच नव्हे तर जगभरातून येतात. म्हणून बीबी का मकबरा विषयी थोडक्यात माहिती देण्यासाठी हिंदी, मराठी आणि इंग्रजी भाषांमध्ये माहिती फलक लावण्यात आलेले आहेत.

## पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम

जालना। प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.शनिवार दि.२५ जानेवारी २०२५ रोजी रात्री ९.२० वाजता वाहनाने शासकीय विश्रामगृह, जालना येथे आगमन राखीव व मुक्काम करतील.

रविवार दि. २६जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८.५० वाजता शासकीय विश्रामगृह, जालना येथून शासकीय वाहनाने पोलिस मुख्यालय मैदान जालनाकडे प्रयाण करतील. सकाळी ९.१५ वाजता पोलिस मुख्यालय मैदान जालना येथे आगमन व भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रध्वज वंदन व संचलन कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी ९.४५ वाजता पोलिस प्रशिक्षण केंद्र जालना, राष्ट्रीय गुणवत्ताप्राप्त खेळाडूंचा सन्मान, क्रीडा क्षेत्रातील विशेष पुरस्कारप्राप्त व्यक्तीच्या सत्कार समारंभास उपस्थिती. सकाळी ९.५५ ते १०.४० वाजता ज्येष्ठ स्वातंत्र सैनिक व मान्यवरांच्या भेटी, देशभक्तीपर गाण्यांचे सादरीकरण, पार्थ सैनिकी शाळा जालना यांचे मल्लखांब कवायत, आभार प्रदर्शन व समारोप. सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण करतील. सकाळी ११.१० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आगमन व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांच्या बैठकीस उपस्थित. सकाळी ११.३० वाजता जालना जिल्ह्यातील पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या विविध प्रश्नासंदर्भात क्षेत्रीय अधिकारी व विविध औद्योगिक संघटनासमवेत बैठकीस उपस्थिती. दुपारी १२.४५ वाजता पशुसंवर्धन विभागाच्या विविध प्रश्नासंदर्भात क्षेत्रीय अधिकाऱ्यांसमवेत बैठक.. सोईनूसार ड्रायपोर्ट प्रकल्पास भेट व छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

## समर्थ साखर कारखान्याला सर्वोत्कृष्ट उद्योजकता पुरस्कार प्रदान



जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील प्रतिष्ठित कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना'' यांना वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे या शिखर संशोधन संस्थेकडून ''सर्वोत्कृष्ट उद्योजकता पुरस्कार प्रदान करण्यात आला. गळीत हंगाम २०२३-२४ साठी देण्यात आलेला हा पुरस्कार कारखान्याच्या उद्योग क्षेत्रातील अग्रणी भूमिका आणि पर्यावरण संवर्धनासाठीच्या प्रतिबद्धतेचे प्रतीक आहे. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी पद्मविभुषण खा.शरद पवार, उपमुख्यमंत्री श्री अजीत पवार , सहकार मंत्री श्री बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते समर्थ उद्योग समुहाचे मार्गदर्शक राजेश टोपे यांनी हा प्रतिष्ठित पुरस्कार स्वीकारला. याप्रसंगी कारखान्याचे संचालक अमरसिंह खरात, नरसिंगराव मुंढे, इतर मान्यवर उपस्थित होते.

## राजेभाऊ फड यांची यशस्वी मध्यस्थी; विजय बडे यांचे उपोषण मागे!

### उपोषणकर्त्यांच्या मागण्यांना पंचायत समिती प्रशासनाकडून लेखी आश्वासन

परळी। प्रतिनिधी

परळी तालुक्यातील मौजे रेवली येथील विजय बडे व त्यांचे सहकारी यांनी विविध मागण्यांसाठी उपोषण सुरू केले होते. उपोषणाच्या आज पाचव्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी उपोषणस्थळी भेट दिली. पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी शिवाजीराव मुंडे आणि पंचायत समितीच्या प्रशासनाशी उपोषणकर्ते विजय बडे यांची चर्चा घडवून आणण्यात आली. त्यांनी केलेल्या मागण्यांची तत्काळ दखल घेण्यात यावी याविषयी राजेभाऊ फड यांनी सूचना केल्यानंतर विजय बडे आणि त्यांचे



सहकारी यांना लेखी आश्वासन देण्यात आले. दिलेल्या लेखी पत्रात समाधानकारक उत्तर मिळाल्याने त्यांनी अमरण उपोषण मागे घेतले.

याविषयी अधिक असे की, तालुक्यातील मौजे रेवली येथील उपोषणकर्ते विजय बडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी मागील पाच दिवसांपासून उपोषण सुरू केले होते. यात प्रामुख्याने भ्रष्ट व कामचुकार सतत अपमानजनक वागणूक देणाऱ्या ग्रामसेवक यांचे निलंबन करण्यात यावे, पंधरावा वित्त आयोग, ९०१० व २५/१५ अंतर्गत सर्व विकास कामांची चौकशी करून संबंधित अधिकारी व गुत्तेदार यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, गट ब व गट क अंतर्गत झालेल्या रेवली पाटी ते जिल्हा परिषद शाळा पर्यंत झालेल्या डांबरीकरण रस्त्याची चौकशी करून संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर गुन्हे दाखल करून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी व संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे या मागण्यांसाठी मागील पाच दिवसांपासून हे उपोषण सुरू होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी पंचायत समिती प्रशासनाला धारेवर धरत उपोषणकर्ते यांची समजूत घातली. तद्नंतर हे उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, ज्येष्ठ नेते उत्तमराव माने, प्रल्हाद गित्ते, भटक्या विमुक्त जाती जमाती सेलचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष दत्ताभाऊ चव्हाण, तालुकाध्यक्ष गणेश देवकते, कैलास सोळंके, परळी तालुका संघटक हनुमंत माने, नितीन भैय्या कदम यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

राज्य लोकतंत्र

रविवार, दि.२६ जानेवारी २०२५ | ६

# नवमतदार जागृती व निवडणूक काम सांघिक सहभागामुळे यशस्वी-शिवकुमार स्वामी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातील प्रत्येक निवडणूक ही इतर जिल्ह्यापेक्षा विलक्षण लक्ष वेधणारी असून महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या असतात. या निवडणुका पार पाडण्यासाठी निवडणूक संबधित अधिकारी, कर्मचारी संघ यात उत्स्फुर्तेने सहभाग नोंदवतात म्हणून येथील निवडणूक संबधित अधिका- यांना चांगले काम करता येते असे प्रतिपादन १५ व्या राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून जिल्हा नियोजन सभागृहात उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी आयोजित कार्यक्रमात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले.

मतदारांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता, सदसदविवेक बुध्दीने मतदान करुन मतदानाचा हक्क बजवावा, बीड जिल्हयातील नवमतदार जनजागृतीसाठी मतदार केंद्रस्तरीय अधिका-यांनी उत्कृष्ट काम केले असल्याचेही श्री. स्वामी यांनी यावेळी नमूद केले.

या कार्यक्रमास उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) शैलेश सुर्यवंशी, पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, तहसीलदार चंद्रकांत शेळके, नरेंद्र कुलकर्णी, अविनाश शिंगटे, दिव्यदुत राजेंद्र लाड, मतदार केंद्रस्तरीय अधिकारी, नवमतदार उपस्थित होते.

**१५ व्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त शपथ**



कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले. १५ व्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त उपस्थित सर्वांनी शपथ घेतली.

मतदान जनजागृतीमध्ये उत्कृष्ट काम करणा-या मतदार केंद्रस्तरीय अधिकारी यांना प्रशस्तीपत्र देऊन तसेच नवमतदारानां निवडणुक ओळखपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी जितेंद्र अवतने केंद्रस्तरीय अधिकारी यांनी काम करत असतांनाचे अनुभव व्यक्त केले तर विद्यार्थीनी विद्यागर हिने मतदान ओळखपत्र मिळाल्याने पहिल्यांदा मतदान करण्याचा आनंद व्यक्त केला.

राजश्री आचार्य यांनी संविधान दिनाचे गीत सादर करुन उपस्थितांच्या टाळया मिळविल्या, तसेच रविंद्र पांगरे यांनी निवडणूकीचे सांगितलेले काम नकार न देता वेळी अवेळी पार पाडल्यामुळे त्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

महापुरुषांचे प्रतिमा पुजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी मुख्य निवडणूक अधिका-यांची मतदार जनजागृती विषयी व्हिडीओ रेकार्डींग ऐकविण्यात आली.

कार्यक्रमाचे सुत्र संचलन कैलास सुतार तर आभार प्रदर्शन उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले.

## निवडणूक आयोगाची भूमिका लोकशाहीला घातक-अशोक पाटील

### जागतिक मतदार दिनाच्या औचित्याने बीडमध्ये काँग्रेसची पत्रकार परिषद

बीड । प्रतिनिधी

जागतिक मतदार दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय काँग्रेस पक्ष राज्यभरात आंदोलन करत आक्रमक झाली असुन याच अनुषंगाने आज काँग्रेसचे माजी मंत्री अशोकराव पाटील यांनी बीडमध्ये पत्रकार परिषद घेतली यावेळी बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे, युवक




काँग्रेस जिल्हाध्यक्ष श्रीनिवास बेदरे, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ थोटे, बीड तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे यांच्यासह जिल्हा काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री अशोकराव पाटील म्हणाले की, निवडणूक आयोग ही संवैधनिक व स्वायत्त संस्था असुन राज्यघटनेने ◀◀ पान ३ वर

## शासनाच्या योजनेतून व्यवसाय सुरु करण्याची संधी मिळाली तिचे सोने करा- माजी आ. साहेबराव दरेकर

### आष्टीत ॲग्री क्लिनिक ॲग्री बिजनेस कोर्सच्या दहाव्या बॅचचा शुभारंभ

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातच नव्हे तर मराठवाड्यात जयदत्त शिक्षण कृषी जलविकास प्रतिष्ठान या संस्थेचा नाव लोकिक आहे पाणलोट क्षेत्र विकास आणि ग्रामीण भागात लघु उद्योग करण्याचे अनेक प्रशिक्षण या संस्थेच्या माध्यमातून झाले आहेत कृषी मंत्रालय भारत सरकार आणि नाबार्डच्या माध्यमातून ॲग्री क्लिनिक ॲग्री बिजनेस कोर्सच्या माध्यमातून



ग्रामीण भागातील कृषी क्षेत्राशी निगडित शिक्षण झालेल्या विध्यार्थ्यांना शासनाच्या योजनेमधून आर्थिक मदत घेऊन उद्योजक बनता येईल शेतकऱ्यांच्या मुलांसाठी हे अत्यंत चांगले आहे विद्यार्थ्यांनी जिद्द चिकाटी वेळेचा उपयोग करून आपला उद्योग यशस्वी केला पाहिजे असे मत माजी आमदार साहेबराव दरेकर यांनी जयदत्त शिक्षण कृषी जलविकास प्रतिष्ठान मध्ये ॲग्री क्लिनिक ॲग्री बिजनेस कोर्सच्या दहाव्या बॅचच्या शुभारंभ प्रसंगी व्यक्त केले या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे हे होते ते म्हणाले की ◀◀ पान ३ वर

## आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेनिमित्त अंबाजोगाई शहरात सहकार दिंडीचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

जागतिक युनो संघटनेने २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन सहकार विभाग , असोसिएशन ऑफ एशियन कॉन्फिडरेशन ऑफ क्रेडिट युनियन,महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन लिमिटेड मुंबई, फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ९ फेब्रुवारी २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचे आयोजन साईबाबाच्या पावन पदस्पर्शाने पावन झालेल्या शिर्डी



येथे करण्यात आलेले आहे. या सहकार परिषदेचे उद्घाटन देशाचे गृहमंत्री तथा केंद्रीय सहकार मंत्री मा. ना. अमित शहा यांच्या हस्ते तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, सहकार मंत्री मा. बाबासाहेब पाटील, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.अजित दादा पवार, मा.एकनाथ शिंदे आणि महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे,फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट चे अध्यक्ष सुरेश यांना वाबळे, त्याचबरोबर महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त, केंद्रीय सहकार सचिव आदि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आणि ४० देशाचे प्रतिनिधी या सहकार परिषदेसाठी उपस्थित राहणार आहेत.

नियोजित सहकार परिषदेनिमित्त अंबाजोगाई शहरात नुकतीच एक बैठक संपन्न झाली. या बैठकीत अंबाजोगाई येथील सहाय्यक निबंधक कार्यालयातील सहा निबंधक संतोष भंडारी यांची नुकतीच पदोन्नती होऊन ते सहकार अधिकारी श्रेणी ग्रेड पदी नियुक्त झाल्याबद्दल त्यांचा शाल , पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. या सहकार परिषदेचा प्रचार आणि प्रसिद्धी व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन व सहकार खात्याच्या वतीने राज्यातील सहकार दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या सहकार दिंडीचे दि ४ फेब्रुवारी २०२५ रोजी अंबाजोगाई शहरात आगमन होणार आहे. ही सहकार दिंडी अंबाजोगाई शहरातून धाराशिव कडे मार्गक्रमण करणार आहे. या सहकार दिंडीच्या स्वागतासाठी अंबाजोगाई, परळी, केज आणि धारूर तालुक्याच्या वतीने जिल्हा उपनिबंधक , ◀◀ पान ३ वर



**आष्टी : यंदाचा २०२५ चा गंगाई- बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार मराठी पत्रकार परिषदेचे ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार गाडेकर व आशोकराव भांडेकर यांना जाहीर झाल्याबद्दल मराठी पत्रकार परिषदे कडून अभिनंदन करण्यात आले.**

## मच्छिंद्रनाथ मायंबा यात्रोत्सवास मंगळवारपासून होणार प्रारंभ

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील सावरगाव येथील श्री क्षेत्र मायंबा मच्छींद्रनाथ देवस्थानच्या तीन दिवसीय यात्रोत्सवास मंगळवार दि.२८ जानेवारी रोजी येथे सकाळी कोठी मिरवणुकीने प्रारंभ होणार आहे, अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष दादासाहेब चितळे, सचिव बाबासाहेब म्हस्के यांनी दिली.

जमा झालेला शिध्याची कोठी मंदिरात विधिवत पूजन होऊन दुपारी ३ वाजता कोठी मिरवणूक याच दिवशी मायंबा गडाकडे प्रस्थान करेल. बुधवार दि २९ जानेवारी रोजी




नवनाथ भक्त मंडळाच्या वतीने विशाल स्वरूपात भंडाऱ्याचे आयोजन केले आहे. देवतलाव जवळ संकलित शिध्याचा नैवेद्य करून मिरवणुकीने आणून दुपारनंतर

देवतांना भोग अर्पण केला जाईल. सायंकाळी सावरगाव येथे छबिना मिरवणूक रात्री ते ११ दरम्यान होईल. गुरुवार दि.३० जानेवारी रोजी नामवंत कलावंत हजेऱ्या, नामवंत मल्लांचा कुस्त्यांचा हंगामा होईल. शुक्रवार दि.३१ जानेवारी रोजी धर्मनाथ बीज होईल. महाप्रसाद होऊन यात्रोत्सवाची सांगता होईल.



**बीड : राज्याचे क्रीडा मंत्री ना.दत्ता भरणे हे प्रजासत्ताक दिनानिमित्त शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमासाठी आले असता, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी माजी आ. संजय दौंड, राष्ट्रवादी लीगल सेलचे जिल्हाध्यक्ष ॲड.नागेश तांबारे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.**

## १००८ श्री स्वामी चरित्र सारामृत सामुहिक पाठाची सेवा अक्कलकोट येथे संपन्न



अंबाजोगाई । प्रतिनिधी

चनई येथील श्री गुरु पादुका मठाच्या वतीने अक्कलकोट येथे सामुहिक श्री स्वामी चरित्र सारामृत १००८ पाठाची सेवा दि.१८ व १९ जानेवारी रोजी अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ विश्रामधाम वळसंग येथे पार पडली.या सामुहिक सेवेसाठी अंबाजोगाई, चनई,धानोरा, मोटेगांव, करमाळा, केज, होळ, बार्शी, ◀◀ पान ३ वर

# नऊ वर्षानंतर पुन्हा चालण्यासाठी बळ द्या

### अनावधनाने घडलेल्या अपघातामुळे मुलगी एकाच जागेवर, दानशूर लोकांनी मदत करण्याची गरज -सय्यद शफाउद्दीन



पाटोदा । प्रतिनिधी

घरात अठरा विश्व दारिद्र त्यामध्ये सातवीच्या वर्गात शिकणाऱ्या मुलीच्या पाठीवर खेळताना बैलगाडी पल्टी झाली त्यामुळे गेल्या ९ वर्षापासून सायमा ही बेडवर झोपूनच जग निहाळीत असुन निदान एक दिवस आपण आपल्या पायावर पुन्हा चालु शकू असा विश्वास आपल्या बोलण्यातुन व्यक्त करते.

पाटोदा शहरापासून काही अंतरावरील शेतात सालगडी म्हणून राहत असलेल्या हुसेन बेग यांची मुलगी सायमा इयत्ता सातवीमध्ये शिकत असताना सुट्टीच्या दिवशी शेतात राबणाऱ्या बापा सोबत गेली होती सोबतीला भावंडेही होती.मोकळ्या जागेत सोडलेल्या बैलगाडीवर भावंडे खेळत असताना सायमा बैलगाडी खाली झोपली असता अनावधानाने बैलगाडी वर झाली व सायमाच्या कमरेवर बैलगाडी पल्टी झाल्याने सायमाला गंभीर दुखापत झाली होती. त्यामुळे सायमाला अहमदनगर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात होते. त्यामध्ये फरक जानवू लागला होता. मात्र घरातील अठरा विश्व दारिद्रय आडवे आले व उपचार थांबवावे लागल्याने मागील ९ वर्षापासून सायमा ही बेडवर पडुनच उघड्या डोळ्यांनी खिडकीतून बाहेरच जग निहाळीत असुन आपल्या पायावर चालणाचे स्वप्न रंगवित आहे. मात्र बेग कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताचीच असुन वडिल सालगडी तर आई शेतमजूर असल्याने मुलीवर उपचार कसे करावे या विवेचनात कुटुंब आहे.

मदतीसाठी दानशूर लोकांनी पुढे यावे

काही कारणास्तव शेतात गेल्याने हा गंभीर प्रकार समोर आला असुन याबाबतीत मी मित्रपरिवाराकडे आवाहन केले असुन काही मदत उपलब्ध झाली आहे त्यातून आम्ही २-३ दिवसात पुणे येथील संचेती हॉस्पिटलमध्ये जाणार आहोत तरी कोणाला या निरागस मुलीला मदत कराची असेल त्यांनी माझ्या मो.क्र.८८८८४५५२८२ यावर मदत करावी किंवा प्रत्यक्ष भेट घ्यावी

सय्यद शफाउद्दीन किसान मशनरी पाटोदा

आमच्यानंतर या मुलीचं काय होणार

आमच्या परिस्थिती नुसार जे करता येईल ते आम्ही करत आहोत मात्र आम्ही गेल्यानंतर आमच्या मुलीचं काय होईल या विचारानेच आमचं कुटुंब खचत आहे

सफिया बेग आई

तर..पुन्हा मी चालु शकते

गेल्या ९वर्षांपासून मी एका जागेवरच असुन माझ्या कुटुंबाची आर्थिक स्थिती खुप खालावलेली असल्याने इच्छा असुनही ते उपचार करू शकत नाहीत दानशूर लोकांनी सहकार्य केले तर मी पुन्हा आपल्या पायावर चालु शकते

सायमा बेग पिडीत मुलगी




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# इंदापुरात अजितदादा, भरणे व्यासपीठावर तर सुप्रिया सुळे, हर्षवर्धन पाटील प्रेक्षकांत

बारामती । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील इंदापुरमध्ये एका कार्यक्रमात मोठं नाराजीनाट्य पाहायला मिळालं. इंदापुरात आयोजित अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या उद्घाटन कार्यक्रमात स्थानिक खासदार सुप्रिया सुळे आणि माजी आमदार हर्षवर्धन पाटील यांना प्रेक्षकांमध्ये बसावं लागलं. याच कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती व्यासपीठावर उपस्थित होते. सरकारी कार्यक्रमात प्रोटोकॉल पाळला न गेल्याबद्दल सुळेंनी नाराजी व्यक्त केली.

सुप्रिया सुळेंनी व्यक्त केली नाराजी

सुप्रिया सुळे या बारामती



लोकसभा मतदारसंघाच्या खासदार आहेत, तरीही त्यांच्या नावाचं निमंत्रण या कार्यक्रमात नव्हतं. कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी त्यांनी स्थानिक मंत्री दत्तात्रय भरणे आणि इतर नेत्यांशी संवाद साधला, परंतु अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांच्यात दुरावा पाहायला मिळाला. दोघांनी एकमेकांशी संवाद साधणं टाळल्याचं दिसून आलं.

सुप्रिया सुळे यांनी अनेक वेळा राज्यभरातील सरकारी कार्यक्रमांमध्ये विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधींना निमंत्रण न दिल्याचा आरोप केला आहे. या कार्यक्रमात देखील त्यांचा सत्कार प्रेक्षकांच्या पंक्तीमध्ये बसून करण्यात आला आहे. दरम्यान इंदापुरातील अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या उद्घाटनाचा कार्यक्रमाची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

त्या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती हजर होते. इंदापूर तालुका बारामती लोकसभा मतदारसंघात येतो. या मतदारसंघाच्या सुप्रिया सुळे या खासदार आहेत. पण त्यांना या कार्यक्रमाचं निमंत्रण नव्हतं. त्याबद्दल त्यांनी नाराजी बोलून दाखवली.

### भावा-बहिणीचा अबोला ठरला चर्चेचा विषय

**इंदापूरात उपमुख्यमंत्री अजित पवार ,खासदार सुप्रिया सुळे, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, माझी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील, मोहोळचे माजी आमदार यशवंत माने, यांच्यासह उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे इंदापुरातील जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायाधीश आणि दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालयाच्या उद्घाटनाला उपस्थित होते.ल सुप्रिया सुळे आणि दत्तात्रय भरणे यांनी या कार्यक्रमावेळी संवाद साधला. हर्षवर्धन पाटील आणि अजित पवार यांचा देखील संवाद झाल्याचं दिसून आलं, पण अजित पवार आणि सुप्रिया सुळे या भाऊ-बहिणीतील अबोला आजच्या या कार्यक्रमामुळे पुन्हा एकदा चर्चेत आला.**

# रामचंद्र केंडे यांना राष्ट्रपती पोलिस पदक

दौंड - पुणे जिल्ह्यातील नानवीज (ता. दौंड) येथील राज्य राखीव पोलिस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य तथा पोलिस अधीक्षक रामचंद्र केंडे यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपतींचे पोलिस पदक जाहीर झाले आहे. शिपाई पदापासून पोलिस सेवेस सुरवात करीत परिश्रमाने ते पोलिस अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत.

प्राचार्य रामचंद्र केंडे हे आंबवली (ता. खेड, जि. रत्नागिरी) येथील असून त्यांचे वडील बाबू केंडे हे दौंड शहरातील राज्य राखीव पोलिस दलात आचारी या पदावर नोकरीस होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण दौंड येथील वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालयात व उच्च माध्यमिक शिक्षण दौंड तालुका कला व वाणिज्य महाविद्यालयात झालेले आहे.

रामचंद्र केंडे हे २६ जून १९८५ रोजी दौंड शहरातील



राज्य राखीव पोलिस दलाच्या गट क्रमांक पाच मध्ये पोलिस शिपाई म्हणून भरती झाले होते. त्यांनी राज्य राखीव पोलिस दलाच्या पुणे, दौंड, कोल्हापूर, सोलापूर येथील गटांमध्ये आणि तुरची (जि. सांगली) येथील पोलिस प्रशिक्षण केंद्रात सेवा बजावली आहे. २००९ मधील पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह तर २०११ मधील गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पोलिस पदकाचे ते मानकरी आहेत. नानवीज येथील राज्य राखीव पोलिस प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणार्थींना सेंद्रिय आहार देणे, शारिरिक तंदुरूस्तीसाठी विविध उपक्रम, कवायतींच्या आधुनिक प्रकारांचा समावेश, आदी विविध उपक्रम श्री. केंडे यांनी राबविले आहेत. प्रशिक्षण केंद्राच्या पाइप बॅण्ड पथकाने महाराष्ट्र राज्य पोलिस पाइप बॅण्ड संघ म्हणून अखिल भारतीय पोलिस बॅण्ड स्पर्धेत तब्बल सहा वेळा विजेतेपद पटकावले आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर रामचंद्र केंडे यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपतींचे पोलिस पदक जाहीर झाले आहे.

# गुलेन बॅरी सिंड्रोमची रुग्णसंख्या ७३ वर; दूषित पाण्यातूनच पसरतो जीवाणू

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरामध्ये गुलेन बॅरी सिंड्रोम या आजाराच्या रूग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याचे दिसून येत आहे. पुणे शहरातील गुलेन बॅरी सिंड्रोमचे (ऋींळश्रश्ररळप इरीीश डूप-वीश) एकूण ७३ रुग्ण सापडले आहेत. गुलेन बॅरी सिंड्रोमचे एकूण रूग्णांपैकी १४ रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. तर ४७ पुरुष तर २६ महिलांचा समावेश आहे. पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात सर्वाधिक ४४ रुग्ण आहेत. ९ वर्षापर्यंत असलेले १३ रुग्ण तर ६० ते ६९ वयोगटातील १५ रुग्ण आहेत. एनआयव्हीच्या अहवालातून या आजाराबाबतचे मूळ कारण निष्पन्न झाले असून, दूषित अन्न व पाण्यातून हे जीवाणू आणि विषाणू पसरल्याने रुग्णांना बाधा झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गुलेन बॅरी सिंड्रोमचे झालेल्या रुग्णांच्या नमुन्यात 'कॅम्पिलोबॅक्टर जेजुनी' हे जिवाणू (बॅक्टेरिया) आढळून आलेले आहेत. हे जिवाणू दूषित पाण्यातून पसरतात. तसेच या जिवाणूमुळेच सिंहगड रस्ता परिसरात 'जीबीएस'चे रुग्ण वाढल्याची दाट शक्यता आरोग्य विभागाकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पाण्यात निर्जंतुक करणारे मिश्रण वापरण्याऐवजी पाणी उकळून व गार करून प्यावे, असं तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे.

### पाणी उकळून प्या...

पाणी उकळल्याने त्यामधील अतिसारसाठी कारणीभूत ठरणारे जिवाणू जसे 'कॅम्पिलोबॅक्टर जेजुनी', 'इ - कोलाय' एका मिनिटांत नाहीसे होतात. जर पाणी महापालिकेच्या व्यतिरिक्त इतर कोणत्या ठिकाणावरून येत असेल तरी देखील ते उकळून आणि गाळून प्यावे. पावसाने गढूळ झालेले असेल तर असे पाणी प्रथम उकळून घ्यावे व गाळून घ्यावे. त्यानंतर ते पिण्यास योग्य होते. तसेच क्लोरीनचाही वापर करता येऊ शकतो. पाणी उकळून पिणे शक्य नसल्यास द्रव स्वरूपातील क्लोरीनचे तीन थेंब दोन लिटर पाण्यासाठी पुरेसे असतात. पाण्यानुसार प्रमाण वाढवावे. तसेच हे थेंब टाकल्यानंतर पाच मिनिटे ते पाणी तसेच ठेवून मग प्यावे, असंही तज्ज्ञ सांगतात.



# कारची बसला जोरदार धडक; एकाचा मृत्यू

पुणे - शहरातील नवले पुलावर शनिवारी पहाटे एक भीषण अपघात झाला. यामध्ये कारने थांबलेल्या बसला पाठीमागून जोराची धडक दिली. यात एक तरुण जागीच ठार झाला. तर कार मधील इतर चौघे गंभीर जखमी झाले. ही घटना सकाळी पाच वाजता नवले पुल येथील बाह्यवळण मार्गावर घडली. जखमींना रुग्णालयात नेण्यात आले असून उपचार सुरु आहेत.

याप्रकरणी सिंहगड पोलीस ठाण्यता गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यातील मृताची ओळख अद्याप पटली नसून सोहम आलिष खळे (१९, रा. कॅसल वर्ल्ड औंध ), आयुष अंबिदास काटे (२०,रा. सिद्धी टॉवर दापोडी ), अथर्व हंबीरराव झेडगे (१९, पिंपळे गुरव ), प्रतीक दीपक बंडगर (१९,रा. गांगर्डे नगर पिंपळे गुरव ), हर्ष नितीन वरे (१९,रा. पिंपळे गुरव ) अशी जखमींची नावे आहेत. बस चालक यास ताब्यात घेण्यात आले असून पुढील कायदेशीर करवाई करीत आहोत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, शनिवारी पहाटे एक खासगी ट्रॅव्हल बस स्वामी नारायण मंदिराच्या पुढे रस्त्याच्या कडेला उभी करण्यात आली होती. सातारच्या दिशेने आलेल्या एका स्विफ्ट कारने बसला मागून जोरात धडक दिली. ही धडक इतकी जोरात होती की, कारच्या पुढच्या भागाचा चेंदामेंदा झाला. कारमधील सहा जणांपैकी एकाचा जागीच मृत्यू झाला. इतर पाच जखमींना नागरिकांनी कसेबसे बाहेर काढले. बसमधील प्रवाशी आणि नागरिकांनी त्यांना नवले रुग्णालयात दाखल केले. तेथून त्यांना एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.



### नवले ब्रीजवर अधिकृत थांबा नाही

नवले पुलावर बंगलोर आणि मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या खासगी बसेस व इतर वाहने प्रवाशी घेण्यासाठी थांबतात. येथे कोणताही अधिकृत थांबा नाही. मात्र खासगी बस चालकांनी ठराविक स्टॉप ठरवले आहेत. तेथे प्रवाशी येऊन थांबतात. हे स्पॉट मुख्य रस्त्यात आहेत. येथे अगोदरही काही अपघात झाले आहेत. नवले ब्रीजवर बसची वाट पहाणाऱ्या प्रवाशांना एका वाहनाने उडवल्याची आणि त्यात दोघांचा मृत्यू झाल्याची घटनाही घडली होती

# सहमतीचे लैंगिक संबंध फसवे ठरू शकत नाहीत; सत्र न्यायालयाचा निष्कर्ष

**पुणे । प्रतिनिधी**

दोन प्रौढ व्यक्तींमध्ये जर सहमतीने लैंगिक संबंध प्रस्थापित झाले असतील तर तो भारतीय न्याय संहिता कलम ६९ अंतर्गत फसव्या मार्गाचा वापर करून केलेले लैंगिक शोषण ठरू शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निरीक्षण जिल्हा व सत्र न्यायाधीश संगीता पहाडे यांनी नोंदविले.



या प्रकरणात बचाव पक्षातर्फे ॲड. हर्षल सुनील पाटील, ॲड. सुरज सुर्यकांत् मादेवाड, ॲड. रणजित डी. साळुंके यांनी जमीन अर्ज दाख़ल केला होता. या प्रकरणात बचाव पक्षातर्फे ॲड. हर्षल सुनील पाटील यांनी युक्तिवाद करताना या गुन्ह्यात घटस्फोटी पीडित व आरोपीची फेसबुकच्या माध्यमातून ओळख झाली. त्याचे रुपांतर प्रेमसंबंधात झाले. त्याने २० जानेवारी ते १९ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत लग्नाच्या अमिषाने लैंगिक शोषण केल्याची तिचे म्हणणे आहे. त्यानुसार गुन्हा दाखल झाला आहे. य़ा प्रकरणात बीएनएसच्या विविध कलमानुसार गुन्हा दाखल झाला आहे. यामध्ये दोषारोपपत्रही दाखल झाले आहे. या प्रकरणात त्याने जामिनासाठी अर्ज केला होता. त्यावेळी ती २७ वर्षांची आहे. सुशिक्षित प्रौढ असल्याने योग्य, अयोग्य संमजण्यास ती सक्षम आहे. त्याच्यावर पूर्वीचा कोणताही गुन्हा दाखल नाही. काहीही हस्तगत करण्यात आलेले नाही. या प्रकरणात तिची वैद्यकीय चाचणीस तिने विरोध केला. त्यामुळे वैद्यकीय चाचणी झालेली नाही. त्यामुळे आरोपीला तुरूंगात ठेवून काहीही साध्य होणार नाही. त्यामुळे त्याला जामीन देण्याची मागणी ॲड. हर्षल पाटील यांनी केली. आरोपीकडून काहीही हस्तगत केलेले नाही. त्यामुळे त्याच्या चौकशीची गरज नाही. त्याला जन्मठेप अथवा फाशीची शिक्षा होणार नाही. त्यामुळे काही अटी व शर्तीवर जामीन मिळण्यास तो पात्र असल्याचा निष्कर्ष देत त्याला जामीन मंजुर केला.

# डॉक्टर तरुणीच्या आत्महत्येप्रकरणी डॉक्टरला नवी मुंबईतून अटक

पुणे । प्रतिनिधी

डॉक्टर तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी एका डॉक्टरला पोलिसांनी नवी मुंबईतून अटक केली.

डॉ. कुलदीप आदिनाथ सावंत (वय ३०, रा. उमराणी रस्ता, शंकर कॉलनी, जत, जि. सांगली, सध्या रा. पुणे) असे अटक केलेल्या संशयिताचे नाव आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉ. सावंत याने त्याचे पूर्वी लग्न झालेले असतानाही जीवनसाथी डॉटकॉम या संकेतस्थळावर अविवाहित असल्याचे दाखवून लग्नासाठी नोंदणी केली होती. तरुणीच्या वडिलांनी स्वतः जावून डॉक्टर मुलाची भेट घेतली. परंतु त्याचे वागणे आणि दवाखाना योग्य न वाटल्याने त्याला नकार कळविला. त्यानंतरही फिर्यादी पोपट फडतरे यांची मुलगी डॉ. पल्लवी हिला मोबाईलवर परस्पर संपर्क केला. तिच्याशी मैत्री करुन, तो अविवाहित असल्याचे भासवून लग्न करण्याचे आमिष दाखवले. डॉक्टर तरुणीकडून १० लाख रुपयांहून अधिक रक्कम घेतली. परंतु ती परत केली नाही. या मानसिक त्रासामुळे डॉ. पल्लवीने आत्महत्या केली. याप्रकरणी बिबेवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहाय्यक आयुक्त धन्यकुमार गोडसे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक शशांक जाधव यांच्या पथकाने या गुन्ह्याचा तपास करून डॉ. सावंत याला नवी मुंबई येथून अटक केली.

# राजगड, तोरणाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करणार -आ. शंकर मांडेकर

वेल्हे । प्रतिनिधी

राजगड व तोरणा किल्ल्यासह आजूबाजूच्या परिसरासाठी मोठ्या प्रमाणात भविष्यात निधी देणार असून प्रत्येक गाव खेड्यातील वाड्या व वस्त्यांमधील रस्ते दर्जेदार करणार असल्याचे आमदार शंकर मांडेकर यांनी सांगितले. गुंजवणे गावचे सामाजिक कार्यकर्ते विष्णू मोरे, राजू दरडिगे, विजय दरडिगे, दिनकर दरडिगे, यांनी विविध विकास कामांसंदर्भात त्यांची भेट घेतली व परिसराच्या विकासासाठी त्यांना निवेदन देण्यात आले.

हिंदवी स्वराज्याची प्रथम राजधानी असलेल्या किल्ले राजगड व स्वराज्याचे प्रथम तोरण बांधलेल्या तोरणा



किल्ल्याच्या विकासाबरोबरच आजूबाजूच्या परिसरातील गाव खेड्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने नेहमीच मी प्रयत्नशील राहणार असून भविष्यात मोठ्या प्रमाणात या ठिकाणी निधी खर्च करण्यात येणार आहे. त्या संदर्भात संबंधित विभागाचे अधिकारी यांची लवकरच तातडीची बैठक लावून संबंधित विकास कामांबाबतचे प्रस्ताव तयार करण्यास येणार असून जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली वेल्हे तालुक्यातील विकास कामांना गती येणार असल्याचे यावेळी आमदार शंकर मांडेकर यांनी सांगितले.

# सोनसाखळी चोरांना पकडून कारवाई करा; शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे पोलीस उपायुक्तांना निवेदन

पुणे : पुण्यात चोरट्यांनी धुमाकूळ गातला आहे. पुण्यातील वेगवेगळ्या भागातून चोरीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातच आता कोथरूड भागातील एरंडवणे, गणेश कॉलनी आणि कर्वेनगर परिसरात गेल्या आठवड्यात ३ ठिकाणी सोनसाखळ्या चोरट्यांनी चोरल्या आहेत. आणि तिन्ही ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांना लुटले आहे. यावरुन आता आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे कोथरुड विधानसभा युवक अध्यक्ष गिरीश गुरनानी चांगलेचं आक्रमक झाले आहेत. गुरनानी यांनी पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांची भेट घेऊन



निवेदन दिले. यावेळी त्यांनी आरोपींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

ज्येष्ठ नागरिकांवर होणारे हल्ले हे मनाला वेदना देणारे होते. सोसायटीच्या पार्किंग मध्ये, शतपावली करतांना, संध्याकाळी भाजीपाला घेऊन येताना ज्येष्ठ महिलांकडील सोनसाखळी चोरीचे प्रकार घडले आहेत. पोलिसांचा धाक आजिबात राहिलेला नाही अशी परिस्थिती आणि भावना कोथरूकरांच्या मनामध्ये आहे. पोलिसांची गस्त वाढवून अशा सोनसाखळी चोरांना तात्काळ पकडून त्यांच्यावर कडक कारवाही केली पाहिजे आणि पोलीस पेट्रोलींग ही वाढवली पाहिजे, असे अध्यक्ष गिरीश गुरनानी यांनी निवेदनात म्हटले आहे. या सर्व प्रकारमुळे कोथरूड मधील सर्व ज्येष्ठ नसगरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. असंही ते म्हणाले. यावेळी पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी लवकरात लवकर चोरट्यांना पकडून त्यांच्यावर कारवाही करू, असे आश्वासन दिल्याचं गुरनानी यांनी सांगितले. यावेळी ऋतुजा देशमुख, आयुष्य बोडके, प्रीतम पायगुडे, संदेश कोतकर उपस्थित होते.

# आमदार सुनील शेळके ॲक्शन मोडवर; पोलिसांना घेऊन मटका अड्ड्यावर दिली धडक

वडगाव मावळ : आमदार शेळके वडगाव शहरात जनसंवाद दौऱ्यावर होते. तेव्हा केशवनगर भागात दौरा सुरू असताना नागरिकांनी रेल्वे लाईनच्या बाजूला मटका अड्डा सुरू असल्याने खूप त्रास होत असल्याच्या तक्रारी आमदार शेळके यांच्याकडे मांडल्या. त्यामुळे आमदार शेळके यांनी थेट ताफ्यासह मटका अड्ड्यावर जावून मटका अड्डा चालवणाऱ्या व्यक्तीला पोलिसांसमोर रंगेहाथ पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. यानंतर प्रभाग ४ मध्ये सुरू असलेल्या दारूच्या अड्डयावरही शेळके यांनी पोलिसांनी सांगून कारवाई करायला सांगितले.

शहरातील वाढती गुन्हेगारी व तरुणांमध्ये वाढणाऱ्या व्यसनांच्या प्रमाणाला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनास सूचना दिल्या असून नागरिकांनी देखील जागरूक राहण्याबाबत यावेळी आमदार शेळके यांनी विनंती केली. आमदार शेळके यांच्या समवेत संवाद साधण्यासाठी महिलांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. दरम्यान प्रत्येक व्यक्तीची तक्रार जाणून घेऊन जागेवरच त्याचे



निरसन करत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. रेशनिंग धान्य, शासकीय योजना, विविध दाखले, रेशनकार्ड या संदर्भातील नागरिकांच्या प्रश्नांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना शेळके यांनी चांगलेच धारेवर धरले. यावेळी माजी उपसभापती गणेशअप्पा ढोरे, माजी नगराध्यक्ष मयूर ढोरे, राष्ट्रवादीचे वरिष्ठ उपाध्यक्ष पंढरीनाथ ढोरे, शहराध्यक्ष प्रवीण ढोरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नगरपंचायतचे मुख्याधिकारी डॉ. प्रवीण निकम यांच्यासह सर्व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी या दौऱ्यात सहभागी होते. आमदार सुनील शेळके यांनी जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून वडगाव शहरातील विशाल लॉन्स, मोरया कॉलनी, साई श्रुष्टी, पंचमुखी चौक, केशवनगर, मोरया चौक, बाजार पेठ, आंबेडकर कॉलनी, माळीनगर, दिग्विजय कॉलनी, संस्कृती सोसायटी, टेल्को कॉलनी, इंद्रायणीनगर, मिलिंदनगर, कातवी गाव या भागात प्रत्यक्ष भेट देऊन विकासकामांच्या आढाव्यासह नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेतल्या तसेच इतर प्रश्नांबाबत प्रशासनास सूचना यावेळी देण्यात आल्या.